रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ७९
www.ramprahar.com

शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'सीसीटीएनएस'मध्ये रायगड पोलीस दलाची पुन्हा सरशी/२

'आगामी निवडणुकीत महायुतीला मतदान करून ताकद द्या'/५

रामशेठ ठाकूर विद्यालयाचा बॉक्सिंगमध्ये विजयी पंच/८

## अहमदनगर आता अहिल्यानगर; केंद्राची मंजुरी




**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेत महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्यास शुक्रवारी (दि. ४) मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. या निर्णयाचे स्वागत होत आहे. अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर असे करण्याची मागणी गेल्या कित्येक दिवसांपासून होत होती. राज्य सरकारने या मागणीच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन केंद्राकडे पाठवला होता. राज्य सरकारकडून पाठवण्यात आलेल्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. दरम्यान, राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ट्वीटद्वारे या निर्णयाचे स्वागत करत केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. गतवर्षी चोंडी येथे झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८व्या जयंती सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नामांतराची घोषणा केली होती.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

# ५६,१०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचा होणार शुभारंभ



**वाशिम, ठाणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (दि. ५) महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून वाशिम आणि ठाणे येथे विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. पंतप्रधान सर्वप्रथम सकाळी ११.१५ वाजता वाशिममधील जगदंबा माता मंदिरात दर्शन घेतील आणि संत सेवालाल महाराज व संत रामराव महाराज यांच्या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहतील.

वाशिममध्ये पंतप्रधान मोदी २३ हजार ३०० कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुपालन क्षेत्रातील विविध उपक्रमांचा शुभारंभ करतील. या योजनेत प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १८वा हप्ता वितरित केला जाणार असून यामुळे सुमारे ९.४ कोटी शेतकऱ्यांना २० हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. पंतप्रधान कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत सुमारे १,९२० कोटी रुपयांचे ७,५००हून अधिक प्रकल्प समर्पित करतील तसेच ९,२०० शेतकरी उत्पादक संघटनांचे राष्ट्रार्पण करतील. बंजारा समाजाच्या समृद्ध वारशाचे प्रतीक असलेल्या बंजारा विरासत संग्रहालयाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

पंतप्रधान मोदी ठाणे येथे सुमारे ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध नागरी विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये मुंबई मेट्रो लाईन ३ फेज १च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी या टप्प्याचे उद्घाटन होईल. हा प्रकल्प मुंबईतील शहरी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. याशिवाय, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि उन्नत पूर्व मुक्त मार्ग विस्तार प्रकल्पांचीही पायाभरणी होईल. ठाणे महापालिकेच्या नव्या इमारतीचा पायाभरणी समारंभही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

या दौऱ्यात पंतप्रधान मोदी महाराष्ट्राच्या कृषी, नागरी आणि औद्योगिक विकासाला चालना देणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन करणार आहेत, ज्यामुळे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल.

### नैना प्रकल्पाची पायाभरणी

एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) प्रकल्प, ज्याच्या फेज-१ पायाभरणी होणार आहे. या प्रकल्पामुळे या भागातील पायाभूत सुविधा विकासाला गती मिळणार आहे.

# महायुती सरकारचे राज्याला बळ

## ■ महत्त्वपूर्ण ३२ निर्णयांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाची बैठक शुक्रवारी (दि. ४) झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत राज्यातील वेगवेगळ्या विभागांतर्गत ३२ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.**



**अकृषिक कर पूर्णपणे माफ**

राज्यातील अकृषिक कर आकारणीचा जनतेवर पडत असलेला बोजा पूर्णपणे काढण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सध्या गावातील गावठाणांमध्ये असणाऱ्या जमिनीवरील अकृषिक कर कायमस्वरूपी माफ आहे, मात्र गावठाणाबाहेर रहिवासी घरांची संख्या आणि शहरी भागात बहुमजली इमारती वाढत असल्याने अशा इमारतींखालील जमिनींचा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनीवरील अकृषिक कर रद्द करण्यात येईल.

**भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ**

मच्छीमार बांधवांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन या वेळी मान्यता देण्यात आली. या महामंडळाचे मुख्यालय नागपूर येथे राहील तसेच मत्स्यव्यवसायमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली या महामंडळाचे कामकाज चालेल. मच्छिमारांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे, मासे टिकवून राहण्यासाठी उपाय सुचविणे तसेच परंपरागत मच्छिमारांच्या हिताचे जतन करण्यासाठी हे महामंडळ काम करेल.

**महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करणार**

सागरी मच्छिमारांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मत्स्यव्यवसायमंत्री या महामंडळाचे अध्यक्ष राहतील. यासाठी सहा पदांची निर्मिती करण्यात येईल तसेच ५० कोटी रुपये एकवेळचे अनुदान म्हणून उपलब्ध करून देण्यात येईल.

**विविध समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे**

राज्यातील जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विविध समाजातील घटकांची सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी तसेच युवकांनाही शिक्षणासाठी फायदा व्हावा यासाठी ही महामंडळे काम करतील. यात जैन समाजासाठी जैन समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल. यासाठी १५ पदे मंजूर करण्यात आली. बारी समाजासाठी संत रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) स्थापन करण्यात येत आहे. याशिवाय तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. **(पान २ वर..)**

### इर्शाळवाडी गृह प्रकल्पाची पाहणी



**खालापूर : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी दरडग्रस्त इर्शाळवाडीतील आदिवासी बंधू-भगिनींसाठी नानिवली येथे उभारण्यात आलेल्या गृह प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. त्यांच्यासमवेत खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, गटविकास अधिकारी संदीप कराड, चौकच्या सरपंच रितू ठोंबरे आदी होते. या वेळी मुख्यमंत्र्यांनी गृह प्रकल्पाची पाहणी करून समाधान व्यक्त केले तसेच इर्शाळवाडी दुर्घटनाग्रस्त कुटुंबांतील सदस्यांशी संवाद साधला. आचारसंहितेपूर्वी या घरांचा ताबा देण्यात येईल, असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.**

## निवडक

### पुण्यात तरुणीवर बलात्कार; आरोपींचे स्केच जारी

**पुणे :** बोपदेव घाटात मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली. मानवाधिकार संघटनेचे कार्यकर्ते असल्याची बतावणी करून तीन जणांनी या तरुणीचे अपहरण केले व नंतर आळीपाळीने लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेतील आरोपींचे स्केच समोर आले आहे. यामुळे आरोपींपर्यंत पोहचण्यास पोलिसांना मदत होणार आहे.

### बदलापूर अत्याचार प्रकरणातील शाळेच्या ट्रस्टींना जामीन मंजूर

**ठाणे :** बदलापूर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर झाल्यानंतर पोलिसांनी फरार आरोपी चेअरमन उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना अटक करून न्यायालयात हजर केले होते. कोर्टाने गुरुवारी (दि. ४) त्यांना दुसऱ्या गुन्ह्यातही जामीन मंजूर केला. यासह शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना आठवलेंनाही जामीन मंजूर करण्यात आल्याने त्यांचीही सुटका झाली आहे.

# कसळखंड सरपंच, ग्रामपंचायत सदस्यासह शेकाप, उबाठा कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील व उरण विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या कसळखंड ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्यासह शेकाप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. ४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे आमदार महेश बालदी आणि भाजपचे नवी मुंबई माजी जिल्हाध्यक्ष तथा उरण निरीक्षक रामचंद्र घरत यांनी स्वागत केले.

उरण द्रोणागिरी येथे झालेल्या या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते नंदकुमार पटवर्धन, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, उरण शहराध्यक्ष कौशिक शाह, गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पोयंजे पं.स. विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, तानाजी खंडागळे, भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी पाटील, कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनंता पाटील, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, माजी उपसरपंच महेंद्र गोजे, महादेव पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुरेश नाईक, बुथ अध्यक्ष मेघश्याम पाटील, सचिन पाटील, नरहरी घरत, शांताराम घरत, हरेश पाटील, योगेश जुनघरे, दत्ता गायकर, सचिन पाटील, प्रफुल्ल मते, सुमित गोजे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वावर आकर्षित होऊन कसळखंड ग्रामपंचायतीचे शेकाप सरपंच संजय घरत, सदस्य उबाठाचे गिरीष पाटील यांच्यासह शिवाजीनगर फणसवाडीतील शेकापचे सुनील पाटील, बाळाराम वाघमारे, विष्णू वाघमारे, रवींद्र वाघमारे, रोषन वाघमारे, गणेश वाघमारे, देवीदास वाघमारे, रामदास वाघमारे, पंढरी वाघमारे, सुरेश डुकरे, महादेव डुकरे, राहुल वाघमारे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# पेणमध्ये अल्पवयीन मुलीवर पोलीस पाटीलाकडून अत्याचार

### पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात रक्षकच भक्षक बनल्याची घटना घडली आहे. ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था जबाबदारी असणाऱ्या एका पोलीस पाटीलाने आपल्या मैत्रीचा गैरफायदा घेत मित्राच्या मुलीवर अत्याचार केल्याची लाजिरवाणी व धक्कादायक घटना वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी महिलेच्या पतीच्या मित्राने मैत्रीचा गैरफायदा घेत फिर्यादीच्या १४ वर्षीय मुलीवर बोरी, कार्ली, लोणावळा येथे १ जानेवारी २०२२ ते ३ ऑक्टोबरदरम्यान अश्लील चाळे केले तसेच नराधमाने तिच्या वडिलांना मारण्याची धमकी देऊन वारंवार तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.

दरम्यान, हे प्रकरण अल्पवयीन मुलीच्या आईला समजताच तिने वडखळ पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. त्यानुसार याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात भा.दं.वि.कलम ६४ (२) (आय) (एम), ६५ (१), ७४, ७५ (१) (१) (४), ७९, ३५१ (२) बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२चे कलम ४,६,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला उपनिरीक्षक योगिता सांगळे करीत आहेत.

# मराठी अभिजात भाषा गौरव दिन ३ ऑक्टोबरला होणार साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्य मंत्रिमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन केले तसेच यापुढे ३ ऑक्टोबर हा दिवस मराठी अभिजात भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार आणि इतर मंत्रीगण उपस्थित होते. मराठी अभिजात भाषा दिन साजरा करण्यासंदर्भातील मंत्रिमंडळाचा ठराव मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांनी वाचून दाखवला.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल राज्य मंत्रिमंडळ पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचे आभार व्यक्त करते, तसेच राज्यमंत्रिमंडळाच्या वतीने केंद्रीय मंत्रिमंडळाचे अभिनंदन करण्यात येत आहे, असे प्रस्तावात म्हटले आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत मंत्री केसरकर यांनी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस व पवार यांना पुष्पगुच्छ देत त्यांचेही अभिनंदनही केले.




## छत्तीसगडमध्ये ३० नक्षलवाद्यांचा खात्मा

**रायपूर : वृत्तसंस्था**

छत्तीसगडच्या नारायणपूरमध्ये झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ३० नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. ठार झालेल्या नक्षलवाद्यांकडून शस्त्रास्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार नारायणपूर-दंतेवाडा सीमेवर माड भागात नक्षलवादी लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नारायणपूर आणि दंतेवाडा पोलिसांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम सुरू केली. या वेळी चकमक झाली. त्यात ३० नक्षलवादी ठार झाले. हा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

# कर्नाळा बँक घोटाळ्यातील इतर आरोपींना अटक कधी होणार?




**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील सुमारे ५४३ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारलेल्या इतर संचालकांना कधी अटक होणार, असा प्रश्न या बँकेचे ठेवीदार विचारत आहेत.

बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळला. मग त्यापाठोपाठ कर्नाळा बँकेतील कोट्यवधींच्या या घोटाळ्यात शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या बरोबरीने सामिल असलेल्या बँकेच्या संचालक मंडळांतील २२ सदस्य आणि इतर अशा एकूण ८३ जणांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या मंडळींना कधी अटक होणार, असे ठेवीदार विचारत आहेत.

बोगस कागदपत्रांच्या आधारे जवळपास पाचशेहून अधिक कोटींचे कर्ज काढल्याप्रकरणी सहकार खात्याच्या तक्रारीवरून जिल्हा विशेष लेखा परीक्षक उमेश तुपे यांनी केलेल्या तक्रारीनुसार भा.दं.वि. कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७, २०१, १२०(ब), ३४सह सहकारी संस्था अधिनियम १९६१ कलम १४७सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबधांचे रक्षण अधिनियम १९९चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे येथील आर्थिक शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त मिना जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. विवेक पाटील यांच्यासह बँकेच्या सीईओ अपर्णा वडके व हेमंत सुताने तसेच संचालक भालचंद्र रामभाऊ तांबोळी, डॉ. अरिफ युसुफ दाखवे यांना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे.

बँकेचे संचालक सुभाष मधुकर देशपांडे, रवींद्र श्रावण चोरघे व अभिजीत पाटील यांचे अटकपूर्व जमीन फेटाळण्यात आल्याने ते फरारी आहेत. या फरारी आरोपींना केव्हा अटक होणार, असा प्रश्न ठेवीदार विचारात आहेत. विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू असताना पनवेलचे जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे यांनीही याबाबत आर्थिक शाखेच्या एसीपी मिना जगताप यांना प्रश्न विचारला की, उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यावर या आरोपींना अटक का झाली नाही, मात्र तरीही त्यांना अटक करण्यासाठी पोलीस अद्याप कोणतीही हालचाल करीत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ठेवीदार नाराजी व्यक्त केरीत आहेत.

# सीसीटीएनएस कार्यप्रणालीत रायगड पोलीस दलाची पुन्हा सरशी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम (सीसीटीएनएस) कार्यप्रणालीमध्ये रायगड जिल्ह्याने राज्यात पुन्हा एकदा सरशी केली आहे. जुलै २०२४मध्ये पुन्हा एकदा २०१ गुणांपैकी १९८ गुण प्राप्त करून राज्याच्या गुणांकनात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

दरमहा पोलीस घटकांच्या सीसीटीएनएस कामगिरीचा आढावा घेण्यासाठी मासिक कामगिरी अहवाल घेण्यात येतो. रायगड जिल्ह्याने सातत्यपूर्ण चांगली कामगिरी करीत राज्याच्या मासिक गुणांकनात दरमहा प्रथम तीनमध्ये स्थान प्राप्त केले आहे. फेब्रुवारी २०२४मध्ये द्वितीय क्रमांक, जानेवारी, मार्च, एप्रिल, जूनमध्ये तृतीय क्रमांक व आता जुलै २०२४मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करीत पुन्हा एकदा रायगड पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

पोलीस अधीक्षक रायगड व अपर पोलीस अधीक्षक रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक, कार्यालय येथे स्थापीत सीसीटीएनएस कक्ष व पोलीस ठाणेस नियुक्त प्रशिक्षीत पोलीस अंमलदारांनी ही प्रशंसनिय कामगिरी केली आहे.

रायगड जिल्ह्यात पोलीस ठाणेस दाखल होणारे गुन्हे, अहवाल यांची सीसीटीएनएसमधील फॉर्मची तत्काळ नोंदणी, महिला, बालके यांच्या विरूद्धच्या गुन्ह्यांची मुदतीत निर्गती, सिटीझन पोर्टलवरील प्राप्त तक्रारींची तत्काळ निर्गती, सीसीटीएनएस प्रणालीचा वापर करून करण्यात येणारे गुन्हे प्रकटीकरण, मिसिंग व्यक्ती, अनोळखी मयत व्यक्ती यांची जुळवणी तथा मागिल पुर्वइतिहास सापडलेल्या आरोपींवरील प्रतिबंधक कारवाई यामध्ये विशेष कामगिरी करीत सदरचे यश प्राप्त केले आहे.

रायगड पोलीस दलाने सदर प्रणालीच्या उत्तम कामगिरीमध्ये सातत्य कायम ठेवले आहे व यापुढेही जिल्हा अग्रस्थानी ठेवण्याकरीता प्रयत्नशिल राहील, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे यांनी केले आहे.

# गव्हाण विद्यालयात 'रयत'चा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचा १०५वा वर्धापन दिन संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि.४)उत्साहात साजरा करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९मध्ये स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचा डोलारा महाराष्ट्रभर मोठ्या दिमाखात उभा आहे. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माउली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी केले. या वेळी ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, राजेंद्र चौधरी, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, गुरुकूल प्रमुख संदीप भोईर, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, चारुशीला ठाकूर, प्रमोद करावकर, माणिक घरत, द्रौपदी वर्तक, वृषाली म्हात्रे, अस्मिता वर्तक, योगिता पाटील, सुजाता शेलार, अर्पणा देवकुळे, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, पारस कोळी, इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी संस्थेच्या स्थापनेचा मूलगामी विचार सांगून कर्मवीर अण्णांनी तळागाळातल्या समाजाला ऊर्जितावस्थेत आणण्यासाठी केलेले अथक प्रयत्न तसेच अण्णांना अभिप्रेत असणाऱ्या विद्यार्थ्यांची आज खरी गरज असल्याचे प्रतिपादन केले. या वेळी स्मित कुंदन मोकल व सात्विक रवींद्र भोईर या विद्यार्थ्यांचीही भाषणे झाली.

कर्मवीर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना भेटवस्तू देऊन तर उत्कृष्ट भाषणाबद्दल स्मित मोकल व सात्विक भोईर यांना लेखनिक चंद्रकांत मढवी यांचे वतीने रोख पारितोषिके देण्यात आली, तसेच गायक वृंदाला विद्यालय सेवक दयानंद खारकर यांचे वतीने रोख पारितोषिक देण्यात आले.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत सर एसए कॉलेज उपविजेते



**मुरुड : प्रतिनिधी**

नुकत्याच पाली सुधागड येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षे वयोगटातील सामन्यांमध्ये सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकाविले.

या संघातील जिग्नेश गायकर याची विभागीय स्तरावर निवड झाली आहे. अंतिम सामन्यात झालेल्या अटीतटीच्या लढतीत अलिबाग संघाने मुरुड संघाला केवळ दोन गुणांनी धूळ चारली. त्यामुळे मुरुड संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत एकूण १३ संघांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी शाळेतील पी.टी. शिक्षक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ, आनंद तोंडले व दीपक पालशेतकर सर यांनी विशेष मेहनत घेतली.

शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे तसेच जंजिरा विद्यामंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर यांनी उपविजेत्या संघाचे विशेष कौतुक केले. निवृत्त क्रीडा शिक्षक व संचालक पी. के. आरेकर सर यांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

# तांबाटी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन

**अलिबाग : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांना शुक्रवारी (दि.४) आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विशेष म्हणजे तांबाटी ग्रामपंचायत ही आयएसओ मानांकन मिळविणारी खालापूर तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. डॉ. भरत बास्टेवाड यांनी तांबाटी ग्रामपंचायतीला नुकताच मिळालेल्या वसुंधरा अंतर्गत पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केले, तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी जि. प. ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, विस्तार अधिकारी महेश घबाडी, ग्रामपंचायत सदस्य नितीन कदम, विकास जाधव व सुखदेव चव्हाण उपस्थित होते.

आयएसओ मानांकन मिळण्यासाठी सरपंच अविनाश आमले, उपसरपंच शितल पाटील यांनी मेहनत घेतली.



# ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील मुळेखंड येथील ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा आणि परिवार यांच्या वतीने नुकताच ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस सोहळा साजरा करण्यात आला.

प्रकाश म्हात्रे, कमलाकर म्हात्रे, नामदेव पाटील, उल्हास सोनकर, सुधीर पाटील, सरोजनी मांडेलकर आदी ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याचे औक्षण करून केक कापून भेटवस्तू त्यांना देण्यात आल्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण पोलीस ठाण्याच्या महिला दक्षता कमिटी सदस्या अनिता प्रवीण घरत, संगीता पवार व सामाजिक कार्यकर्त्या प्रमिला गाडे, पत्रकार दिनेश पवार, कार्याध्यक्ष अनंत पाटील, अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सचिव परशुराम पाटील, सहसचिव सुभाष गुरव, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहखजिनदार गोपीनाथ मांडेलकर व सर्व सदस्य आदी उपस्थित होते.



# कोयना जांब्रुक येथील ६५ वर्षांची घटस्थापनेची परंपरा

**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू असलेली कोयना जांब्रुक गावची नवरात्री घटस्थापनेची परंपरा पुनर्वसन झाल्यावर ६५ वर्षांनंतरदेखील कायम आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फौजेत आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना साथ देणारे कदम सरदार सातारा जिल्ह्यातील जावळी खोऱ्यात जांब्रुक या गावात कायम स्वरुपी वास्तव्यात होते. तेव्हा आणि त्या अगोदर ही येथे नवरात्रोत्सव साजरा केला जातो. नवसाला पावणारी आई जानाई व आई इंजाई ही ग्रामदेवता आहेत. दक्षिणमुखी आई इंजाईसमोर घटस्थापना होते. गावातील प्रत्येक घरातून धान्य, कडधान्य आणले जाते. हे कडधान्य एकत्र करून गाईच्या दुधात भिजवले जाते. त्यावर घट बसविण्यात येतो आणि त्यावर माळ सोडली जाते. या कडधान्याला रोज दूध घातले जाते. त्याचा रो तयार होतो.





या काळात मंदिर कायम दर्शनासाठी खुले असते. रात्री सर्व ग्रामस्थ मंदिरात उपस्थित राहून मंदिराला पाच प्रदक्षणा घालतात. त्या नंतर देवीचा जागर गोंधळ होतो. हा जागर गोंधळ करण्यासाठी सातारा जिल्ह्यातील मूळ गावचे गोंधळी येतात. या नऊ दिवसात नोकरी, व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असलेले ग्रामस्थ दर्शन आणि ओटी भरण्यासाठी येतात.

# 'बीसीटी'मध्ये प्रमाणपत्र वितरण

**पनवेल :** भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कॉलेज ऑफ लॉचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ शनिवारी (दि.५) कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये होणार आहे. या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ज्युरिस्ट लंडनचे अध्यक्ष तसेच ऑल इंडिया बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. डॉ.आदिश अग्रवाला, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, आमदार प्रशांत ठाकूर, कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, कॉलेज विकास समितीचे सदस्य अॅड. विनायक कोळी, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ, पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी, उपस्थित राहणार आहेत.

# सीकेटी कॉलेजमध्ये विज्ञान संघटनेचे उद्घाटन आणि प्रोजेक्टचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विज्ञान संघटनेचे उद्घाटन शुक्रवारी (दि.४) करण्यात आले.

उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एमबीएसआय इंडियाचे राज्याध्यक्ष प्रो. डॉ. महेंद्र रांजेकर व एडीएम रिसर्च ग्रुप सेंटर फॉर एन्व्हायरनमेंट बेनिफिशियल कॅटालिसिस, युनिव्हर्सिटी ऑफ केन्सस युनायटेड स्टेटचे डॉ. अपूर्व रांजेकर लाभले होते. या वेळी प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे तसेच सर्व विभागप्रमुखांनी उपस्थिती दर्शविली.सर्वप्रथम प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. महेंद्र रांजेकर यांच्या हस्ते पोस्टर्स, मॉडेल्च्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.



विज्ञान संघटना आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या समन्वयाने भारतातील जैविक उद्योजकता या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांनी महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला, तसेच विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा दिला. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. एस. डी. चांडवेकर यांनी प्रो. डॉ. महेंद्र रांजेकर यांचा परिचय उपस्थितांना करून दिला.

या व्याख्यानामध्ये प्रमुख पाहुणे प्रो. डॉ. महेंद्र रांजेकर यांनी भारतातील जैव उद्योजकता, अक्षय इंधन या विषयांवर मार्गदर्शन केले आणि डॉ. अपूर्व रांजेकर यांनी विद्यार्थ्यांना हायड्रोजनचे वर्तमान आणि भविष्यातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची विद्यार्थिनी निशा जहांगीर हिने केले, तसेच रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. सपना चिलाटे यांनी आभारप्रदर्शन केले.

पान १ वरून

## महायुती सरकारचे राज्याला बळ

**प्राचीन, ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास दोन वर्षांचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद**

राज्यातील प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांच्या तुरुंगवासाची तसेच एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. अशा वास्तूंना हानी पोहचवून त्यांचे पावित्र्य भंग करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी ही तरतूद करण्यात येत आहे.

**खेळाडूंसाठी पारितोषिकांच्या रकमेत वाढ**

आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडूंना आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यानुसार ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेत्यांना पाच कोटी रुपये, रौप्यपदकासाठी तीन कोटी, कांस्यपदकासाठी दोन कोटी रुपयांचे पारितोषिक, तर मार्गदर्शकांना अनुक्रमे ५० लाख, ३० लाख व २० लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल. इतरही स्पर्धांमधील पदकांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे.

**कोकण, पुणे विभागासाठी एसडीआरएफच्या दोन कंपन्या**

कोकण व पुणे विभागासाठी प्रत्येकी एक या प्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या-एसडीआरएफच्या दोन कंपन्या स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. कोकणात नवी मुंबई येथे आणि पुण्यात दौंड येथे या कंपन्या असतील. प्रत्येक कंपनीत एकूण चार टीम असतील. त्यापैकी तीन टीम प्रत्यक्षात आपत्ती प्रतिसादात काम करतील. या दोन्ही कंपन्यांसाठी ४२८ पदे पोलीस महासंचालकांमार्फत निर्माण केली जातील. यासाठी ३७ कोटी रुपये खर्च येईल.

**संत भगवानबाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना**

राज्यातील सर्व ऊसतोड, वाहतूक कामगार व मुकादमांना झोपडी व बैलजोडीकरिता विमा संरक्षण देण्यासाठी संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रतिवर्षी प्रति मेट्रीक टन दहा रुपयांप्रमाणे मिळणाऱ्या निधीतून या विमा योजनेसाठी खर्च करण्यात येईल. दि न्यू इंडिया अश्युरन्स कंपनी ही यासाठी विमा कंपनी असेल.

# सीकेटी विद्यालयात हिंदी दिवस उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्जी माध्यम माध्यमिक विद्यालयात हिंदी दिवस शुक्रवारी (दि.४) उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. साईनाथ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना हिंदी विभागप्रमुख शशिकला पाटील यांनी केली. विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटिका तसेच महाभारताच्या संकल्पनेवर आधारित शास्त्रीय नृत्य असे शशिकला पाटील आणि प्रमोद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले, तसेच गायकवृंदाने देशभक्तीपर गीत सादर केले. हिंदी कविता गायन तसेच हिंदी भाषण स्पर्धेतील विजेत्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रा. साईनाथ पाटील यांनी, हिंदी ही करिअर करण्याच्या दृष्टीने कशी महत्त्वपूर्ण आहे, तसेच हिंदीचे महत्त्व यावर आपले विचार मांडले. इंग्जी जरूर शिका, परंतु आपल्या भाषेवर प्रभुत्व मिळवा आणि राष्ट्रभाषेचा अभिमान बाळगा, असे सांगितले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी, हिंदी विभागप्रमुख शशिकला पाटील आणि हिंदी विभागातील सर्व शिक्षकांचे सुनियोजित कार्यक्रम सादर केल्याबद्दल कौतुक केले, तसेच विद्यार्थ्यांनी भविष्यात आपल्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी अशा शालेय उपक्रमात वेळोवेळी सहभागी झाले पाहिजे, असेही ते म्हणाले.

प्रती जाधव, आस्था त्रिपाठी व अणु मेनन या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमाशी शिक्षक अशोक पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.


ऊर्जा विभाग
MAHA SOLARAGRO
महावितरण
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
मा. पंतप्रधानांच्या शुभहस्ते
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
शेतीसाठी जगातील सर्वात मोठा 'विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्प' (१६,००० मेगावॅट)
पीएम कुसुम, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत
पहिल्या ५ सौर पार्कचे (१९ मेगावॅट) लोकार्पण
दि. ५ ऑक्टोबर २०२४, स्थान – पोहरादेवी, जि. वाशिम
येत्या अठरा महिन्यांत ४५ लाख शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा सौर ऊर्जेचा पुरवठा
महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र वीज कंपनीची स्थापना
ग्रामीण क्षेत्रात ६५,००० करोड रु. ची गुंतवणूक
५०००० ग्रामीण रोजगार निर्मिती
प्रमुख उपस्थिती
सी. पी. राधाकृष्णन
राज्यपाल
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
शिवराजसिंह चौहान
केंद्रीय मंत्री, कृषि आणि शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास
राजीव रंजन सिंह ऊर्फ ललन सिंह
केंद्रीय मंत्री, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, पंचायतराज, दुग्धविकास
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
प्रतापराव जाधव
केंद्रीय राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंबकल्याण आणि आयुष मंत्रालय
राधाकृष्ण विखे पाटील
मंत्री, महसूल, पशु संवर्धन व दुग्धविकास
गिरीश महाजन
मंत्री, ग्रामविकास, पंचायतराज, पर्यटन
संजय राठोड
मंत्री, मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री, वाशिम जिल्हा
धनंजय मुंडे
मंत्री, कृषी


महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना
दरमहा ₹ १५००
मिळत आहेत त्याचे
लाख करुन दाखवणार...
वय वर्ष २१ ते ६५ गटातील महिला पात्र
आतापर्यंत १ कोटी ९६ लाख पात्र महिलांना लाभ
आपलं सरकार
लाडकं सरकार
/MahaDGIPR
mahasamvad.in
MAHARASHTRADGIPR
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
अजित पवार
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

## संपादकीय

# ऐतिहासिक निर्णय!

आपल्याला कायमच मराठी भाषेबद्दल प्रेम वाटत आले असून आपण मराठीला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी निश्चितच प्रामाणिक प्रयत्न करू, अशी ग्वाही खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे महिन्यात मुंबईतील रोडशोमध्ये दिली होती. पंतप्रधान मोदी यांनी दिलेले आश्वासन म्हणजे पूर्ततेची गॅरंटी असते हे सामान्य माणूस जाणतोच. तेच पुन्हा एकदा खरे ठरले असून मोदी सरकारने मराठी जनांची प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेली मागणी मान्य करून अखेर मराठी भाषेस 'अभिजात दर्जा' बहाल करण्याचा ऐतिहासिक निर्णय गुरुवारी घेतला.

**मराठीसोबतच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी मान्यता दिली. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने एक भाषा म्हणून मराठीच्या सर्वंकष विकास व विस्ताराची सुवर्णसंधी खुली झाली आहे. हा सन्मान भारताच्या इतिहासात मराठीच्या समृद्ध सांस्कृतिक योगदानाची कबुली देतो. मराठी भाषा नेहमीच भारतीय वारशाचा आधार राहिली आहे असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयानंतर काढले. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आणखी बरेच लोक ती शिकण्यास प्रवृत्त होतील अशी खात्रीही त्यांनी व्यक्त केली. हा निर्णय म्हणजे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांचे फलित आहे. मराठी भाषेच्या नावाने गळे काढणाऱ्या राजकीय पक्षांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी मात्र कोणतेही प्रयत्न केले नाहीत. त्यांनी यासंदर्भात केवळ राजकारण केले, परंतु देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पाठपुरावा समिती स्थापन केली. या समितीचे अध्यक्षपद ज्ञानेश्वर मुळे यांच्याकडे सोपवले. या समितीने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा प्रस्ताव प्रशासकीय स्तरावर मागे पडू नये, कोणत्याही तांत्रिक बाबींत तो अडकून राहू नये याची काळजी घेतली. साहित्य अकादमी, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय आणि पंतप्रधान कार्यालयाच्या सातत्याने संपर्कात राहून येणारी प्रत्येक अडचण तात्काळ दूर करण्यासाठी ही समिती तत्पर होती. महाराष्ट्राचा प्रस्ताव जुना असून त्यावर जुन्या निकषांप्रमाणेच विचार व्हावा हे पटवून देण्यात समितीला यश आले. महाराष्ट्र सरकारने २०१३ साली केंद्र सरकारकडे मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची विनंती करणारा प्रस्ताव पाठवला होता, परंतु राज्यात २०१४ साली सत्ताबदल होऊन भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार आल्यानंतरच यासाठीच्या प्रयत्नांना वेग आला. भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे, ती भाषा स्वयंभू असावी, प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा, संबंधित भाषेतील प्राचीन ग्रंथ हे वक्त्यांच्या अनेक पिढ्यांद्वारे भाषा वारसा मानले जावेत आदी निकष केंद्र सरकारने अभिजात भाषेसाठी निश्चित केले आणि पुन्हा मराठीसह अन्य पाच भाषांची अभिजात भाषा मानण्याबाबत शिफारस केली गेली. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केले. मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी आता राज्याला केंद्राकडून भरीव अनुदान मिळेल, भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय शक्य होईल. तसेच मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना भरीव मदत दिली जाईल. मराठी भाषेला सुयोग्य स्थान प्राप्त करून देण्यासाठी आवश्यक असलेले मराठी भाषा धोरणही राज्यातील महायुती सरकारने अलीकडेच जाहीर केले आहे. या साऱ्या प्रयत्नांमुळे भाजप मराठी भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील असल्याची खात्री मराठी माणसाला निश्चितपणे पटलेली दिसते.**

# माणगावमधील रीळे-पाचोळे येथे बहरले पठार



माणगाव शहरापासून केवळ तीन किलोमीटर अंतरावरील रिळे आणि पाचोळे या दोन गावांच्या मधील शेकडो एकर जमिनीच्या पठारावर निसर्गाने पिवळसर चादर ओढल्याचे, जणू सोनेरी शालूला हिरवीगार किनार जोडली आहे असे निसर्गरम्य चित्र दिसत आहे. रस्त्याच्या कडेला उभे राहून पाहिले तर अद्भूत निसर्गाच्या चमत्काराने नजरेत भरेल एवढे निसर्गाने मुक्तहस्ते सोन्याचा मुलामा देऊन उधळण केल्याचे मनमोहक तरंग दिसतात.


संपूर्ण सपाट परिसरात सोनेरी-पिवळी छोटीछोटीशी फुले लक्ष वेधून घेतात. ही छोटी फुले वाऱ्यावर डोलताना सुंदर आणि रूपवान स्त्रीच्या साडीचा पदर हळूवारपणे अलगद पुढे सरकत असल्याचा भास होत असतो. सुसाट वारा सुटला तर समुद्रातील लाटा अंगावर येत असल्याचा आनंद हा विरळाच म्हणावा लागेल. या परिसरात ही पिवळी बहारदार फुले कवळा या लहानग्या वनस्पतीची विखुरलेली आहेत तसेच इतरही अनेक आकर्षक विविध प्रकारची फुले उगवलेली आहेत. रानभाज्या आणि औषधीदेखील भाज्या पहावयास मिळतात, तर विविध रंगांची फुलपाखरे येथे वावरताना दिसतात. शहरात असे दृश्य क्वचितच पहायला मिळते.

या जागेवर एकाच प्रकारची पिवळसर सोनेरी पैठणी गुंफून निसर्ग मातेने एकाच ठिकाणी नक्षीकाम केलेले पहताना मन मोहून गेल्याशिवाय राहत नाही. पहाटे आणि सकाळी या कोमल फुलांवर पडलेले दवबिंदू हे चकचकीत हिऱ्याच्या कोंदण पाडलेले सुंदर स्वप्न वाटते. या पावसाळ्यात पावसाचे थेंब पिवळ्या आणि हिरव्या पानांवर ओघळताना दिसल्यावर आई आपल्या लहानग्या बाळाला जणू अंघोळ घालताना जसे पाण्याचे तुषार आजूबाजूला उडताना दिसतात तसंच काहीसं चकचकीत पाणीदार हिरे-माणिक टपाटप पडताना दिसत असतात. त्यातच वाऱ्याची मंद झुळूक अंगावर शहारे आणून मानवी शरीराला प्रसन्न करतात.

रिळे आणि पाचोळे गावाला निसर्गाने भरभरून दान दिल्याने या निसर्गरम्य परिसरात विविध प्रकारची जैवविविधता आढळून येते. सकाळी मोर आणि लांडोर या प्राण्यांच्या गोड आवाजाने नीरव शांततेत अधिकच आनंदाची भावना होते. आजुबाजूला असलेल्या वनश्री परिसरात विविध पक्ष्यांचे आवाज सतत रुंजी घालत असतात. सकाळची कोवळी उन्हाची तिरीप आणि किरणं या पिवळ्या फुलांवर पडल्यावर ती फुले फुलराणीसारखी दिसतात. हे दर्शन मनाला भुरळ घालते. सकाळीच पक्ष्यांची मंजुळ किलबिल, पोपटांचे विटू विटू, कोकीळेचे कुहूकुहू, चिमुकल्या चिमण्यांची चिवचिव, कावळ्यांचे काकरव, कोंबड्यांची बांग, गायीच्या वासराचा हंबरडा हे सारं आल्हाददायक वातावरण एक वेगळीच ऊर्जा निर्माण करीत असतात. येथील विविध प्रकारची वृक्षवल्ली शुद्ध हवा मुक्तपणे संवाद साधताना मन टवटवीत करतात.

रिळे आणि पाचोळे या गावांना दरवर्षी पुराच्या पाण्यामुळे धोका निर्माण होतो. त्यामुळे काही दिवस हे सोनेरी पठार पाण्याखाली जाते. त्या वेळी गावांचा माणगावशी असलेला संपर्क तर तुटतोच, परंतु येथील नैसर्गिक जैवविविधता मरणासन्न अवस्थेतून असते. त्याला जीवदान दिले तर निसर्गाच्या साधनसंपत्तीत अधिक वाढ होऊ शकते तसेच पारंपरिक भातशेती, भाजीपाला, कडधान्ये अधिक जोमाने घेता येतील. शासनाने या गावांकडे जाणाऱ्या रस्त्याची उंची वाढवून रुंदीकरण केल्यास हे निसर्गाचे वरदान आणि देणं पाहण्यासाठी पर्यटक सप्टेंबर, ऑक्टबरपर्यंत येथे येऊ शकतील, कारण ही निसर्गसंपदा आणि सौंदर्य याच काळात दिसते. येथील सुर्योदय शिवरायांच्या रायगड किल्ल्याचे दर्शन घडवून स्फुरण चढवते व सुर्यास्त मनाला समाधान देतो. **(माणगाव प्रतिनिधी)**

# मानवतावादी लेखक भगवतीचरण वर्मा



भगवतीचरण वर्मा यांचा आज स्मृतिदिन. भगवतीचरण वर्मा हे आधुनिक हिंदी कादंबरीकार, कथाकार व कवी. त्यांचा जन्म ३० ऑगस्ट १९०३ रोजी उत्तर प्रदेशातील उन्नाओ जिल्ह्यात शफीपूर या छोट्या खेड्यात झाला. जगमोहन विकसित यांच्या प्रेरणेने भगवतीचरण यांनी मैथिलीशरणांचे भारतभारती काव्य अभ्यासले व त्या प्रभावातून सातव्या इयत्तेत असल्यापासूनच ते स्वतः कविताही रचू लागले. बीए (१९२६), एलएलबी (१९२८) झाल्यावर १९३५पर्यंत त्यांनी वकिली केली.

काही काळ ते भदरी संस्थानाधिपतींच्या दरबारी होते. पुढे त्यांनी कोलकात्यात विचार साप्ताहिकाचे संपादक म्हणून (१९४०-४२) तसेच मुंबईत चित्रपटसृष्टीत पटकथाकार म्हणून (१९४२-४७) काम केले. १९४८ ते १९५७पर्यंत ते लखनौ येथील नवजीवन या दैनिकाचे संपादक होते. १९५०पासून त्यांची आकाशवाणीच्या दिल्ली केंद्रावर हिंदी सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. उत्तर प्रदेशातील 'भारती' या साहित्यिक संस्थेचे संयोजक म्हणूनही त्यांनी काम केले.

वर्मांच्या साहित्यसेवेचा प्रारंभ कवितांनी झाला. 'मधुकण' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९३१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'प्रेम-संगीत' (१९३७) व 'मानव' (१९४०) हे त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या कवितेवर प्रारंभी छायावादाचा प्रभाव असला तरी एका विशिष्ट वादाला धरून अशी त्यांची कविता पुढे राहिली नाही. मानवतावादी दृष्टिकोन त्यांच्या सर्व लेखनातून प्रकट होतो. कविता छंदोबद्ध असावी, असा त्यांचा आग्रह होता. एक प्रकारची बेहोषी, कलंदरपणा व स्वच्छंदतावादी वृत्ती हे विशेष त्यांच्या काव्यात आढळतात.

'पतन' ही त्यांची पहिली कादंबरी (१९२८). त्यानंतरची 'चित्रलेखा' (१९३३) ही त्यांची कादंबरी अत्यंत गाजली. 'तीन वर्षं' (१९३६) ही सामाजिक कादंबरी म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीने दिपून गेलेल्या तरुणाच्या व्यथेची कथा आहे. टेढे-मेढे रास्ते (१९४७) या राजकीय-सामाजिक पार्श्वभूमीवर आधारलेल्या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध विचारसरणी (सामंतवाद, गांधीवाद, दहशतवाद, साम्यवाद, क्रांती इ.) व त्यांचे संघर्ष चित्रित केले आहेत.

'भूले-बिसरे चित्र' (१९५९) मध्ये देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील तीन पिढ्यांचे चित्रण आहे. 'अपने खिलौने' (१९५७) या कादंबरीत दिल्लीतील अत्याधुनिक समाजावर व्यंगात्मक औपरोधिक भाष्य आहे. एकांकिकाकार व नाटककार म्हणूनही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. 'बुझता दीपक' (१९५०) हा एकांकिका-संग्रह 'रुपया तुम्हे खा गया' (१९५५) हे नाटक महाकाल, कर्ण व द्रौपदी या नमोनाट्यांचा एकत्रित संग्रह आहे. 'इन्स्टॉलमेंट' (१९३६), 'दो बाँके' (१९४१), 'राख और चिनगारी' (१९५३), 'मोर्चाबंदी' (१९७६) हे त्यांचे कथासंग्रह आहेत. त्यांच्या भूले बिसरे चित्र या कादंबरीस साहित्य अकादमीचा पुरस्कार (१९६१) लाभला.

प्रेमचंदांच्या नंतर समाजातील स्थित्यंतरांचे साहित्याच्या माध्यमातून इतके प्रभावी व प्रत्ययकारी चित्रण भगवतीबाबूंनीच केले. उपरोधप्रचुर, व्यंग्यात्म चित्रण हे त्यांच्या शैलीचे बलस्थान होय. सूक्ष्म परिहासपूर्ण विनोद, सामाजिक राजकीय जीवनाचे वास्तव चित्रण, सूचक आदर्श ही वैशिष्ट्ये वर्माजींच्या गद्य कृतींत दिसून येतात. अशा या लेखकाचे ५ ऑक्टोबर १९८१ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)




# व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉलचा आनंद होणार द्विगुणित

व्हॉट्सअ‍ॅप हे इन्स्टंट मेसेजिंग अ‍ॅप असून त्यावर काही नवीन फीचर्स लाँच करण्यात आले आहेत. हे नवीन फीचर्स व्हिडीओ कॉलसाठी आले आहेत. यामुळे व्हिडीओ कॉल्स आता अधिक मजेदार होणार आहेत लेटेस्ट अपडेटनंतर, युजर्सना नवीन फिल्टर आणि व्हिडीओ कॉल दरम्यान बॅकग्राऊंड बदलण्याचा पर्याय मिळेल. व्हिडीओ चॅटिंग दरम्यान युजर्स वेगवेगळे फिल्टर आणि बॅकग्राऊंड वापरू शकतात. व्हॉट्सअ‍ॅपमध्ये येणारे नवे फीचर्स कसे वापरायचे हे जाणून घेऊया...



व्हॉट्सअ‍ॅपमध्ये नवीन फिचर फिल्टरचा समावेश करण्यात आला आहे. त्याच्या मदतीने युजर्स त्यांच्या व्हिडिओमध्ये Artistic Effects समाविष्ट करता येतील ज्यामध्ये युजर्सना रंग किंवा युनिक स्टाईल पाहण्यास मिळेल. हे व्हिडीओ कॉलला अधिक चांगले व्हिज्युअल स्वरूप देईल.

युजर्सना १० नवीन फिल्टर्स पाहायला मिळतील. यामध्ये वॉर्म, कूल, ब्लॅक अँड व्हाईट, ड्रीमी इत्यादी विविध पर्याय दिले आहेत. प्रत्येक फिल्टर वेगळा अनुभव देतो. युजर्स त्यांच्या संभाषणाच्या मूडनुसार फिल्टर निवडू शकतात.


व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉलदरम्यान बॅकग्राऊंड सहज बदलता येतं. त्याच्या मदतीने, तुम्हाला तुमच्या बॅकग्राऊंडमध्ये नेमकं काय दाखवायचं आहे ते तुम्ही सहजपणे निवडू शकता.

फीचरच्या मदतीने युजर्स त्यांच्या बॅकग्राऊंडमध्ये कॅफे किंवा बीच इत्यादी ठिकाणं दाखवू शकतात. याशिवाय यामध्ये ब्लर इफेक्टही दिसणार आहे. फिल्टर्सप्रमाणे यामध्येही १० बॅकग्राउंड ऑप्शन उपलब्ध असतील.

व्हॉट्सअ‍ॅपच्या या नव्या फीचरचा वापर करण्यासाठी, युजर्सना व्हिडीओ कॉल दरम्यान फक्त एक सोपं काम करावं लागेल. यासाठी, युजर्सना वरच्या उजव्या बाजूला असलेल्या इफेक्ट्स आयकॉनवर क्लिक करावे लागेल.

यानंतर तुम्हाला उपलब्ध ऑप्शन्सवर जावं लागेल. सध्या हे फीचर रोलआउटच्या आधारावर तयार करण्यात आलं आहे आणि लवकरच हे फीचर सर्व युजर्सपर्यंत पोहचेल अशी माहिती मिळत आहे.

# भारताचे माजी क्रिकेटपटू माधव आपटे



## निमित्त

भारताचे सुरुवातीच्या काळातील क्रिकेटपटू माधव आपटे यांचा जन्म ५ ऑक्टोबर १९३२ रोजी मुंबईत झाला. त्यांनी भारताकडून सात कसोटी सामने खेळले होते. त्यांचे पदवी शिक्षण मुंबई विद्यापीठामध्ये झाले. फाईन आर्टचे त्यांचे शिक्षण घेतले होते. ते १९८९मध्ये त्यांची भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यांचे बंधू अरविंद आपटे हेसुद्धा प्रथमश्रेणी क्रिकेटपटू होते.

माधव आपटे लेगस्पिनर होते. एलफिन्सटन महाविद्यालयात असताना त्यांनी विनू मंकड यांच्या मार्ग्दर्शनात क्रिकेटचे धडे गिरविले. १९५२मध्ये त्यांनी प्रथमच रणजी स्पर्धेत सौराष्ट्रकडून पदार्पण केले. विजय मर्चंट यांना दुखापतीमुळे संघाबाहेर ठेवल्याने ही संधी त्यांना मिळाली होती. नंतर १९५३मध्ये वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी त्यांची निवड झाली. पोर्ट ऑफ स्पेन येथे झालेल्या सामन्यात त्यांनी चांगल्या धावा काढून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

माधव आपटे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात १९४८मध्ये केली. १९५२मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यातून भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. आपटे यांनी १९५२-५३ या काळात सात कसोटी सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व केले. या सात कसोटी सामन्यात ४९.२७च्या सरासरीने ५४२ धावा केल्या होत्या. यामध्ये त्यांनी एक शतक आणि तीन अर्धशतके केली होती.

विंडीजमध्ये सर्वोत्तम वैयक्तिक खेळीचा १६३ धावांचा त्यांचा हा विक्रम १८ वर्षे अबाधित राहिला होता. ते शेवटचा कसोटी सामना वेस्ट इंडिजविरुद्ध मार्च-एप्रिल १९५३मध्ये खेळले.

आपटे यांनी मुंबईकडून खेळताना रणजी क्रिकेटमध्ये २०७० धावा केल्या. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांच्या नावावर सहा शतकांसह ६७ सामन्यांत ३३३६ धावा आहेत. क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी मुंबईचे नगरपालपद भूषविले होते.

आपटे यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ६७ सामन्यात ३८.७९च्या सरासरीने ३३३६ धावा केल्या होत्या. यामध्ये त्यांनी सहा शतके आणि १६ अर्धशतके केली. त्यांनी १९५८-५९ आणि १९६१-६२मध्ये रणजी ट्रॉफीचे विजेतेपद मिळवलेल्या मुंबई संघाचे नेतृत्वही केले होते.

भारताचे माजी क्रिकेटपटू विनू मंकड यांनी आपटेंच्या क्रिकेट कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका निभावली होती. आपटे वयाच्या ७० वर्षापर्यंत कांगा लीगमध्ये खेळत होते. त्यांचा भाऊ अरविंद आपटेही भारताकडून एक कसोटी सामना खेळला तसेच आपटेंचा मुलगा वामन यांनी भारताकडून स्क्वॉश खेळले आहे. भारताचे माजी कसोटीपटू माधव आपटे यांचे २३ सप्टेंबर २०१९ रोजी वयाच्या ८६व्या वर्षी ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!




**पनवेल : महापालिकेतर्फे स्वच्छता ही सेवा मोहिमेंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यानुसार चारही प्रभागांमध्ये सुमारे ११ ठिकाणी वेस्ट टू आर्ट अंतर्गत टाकाऊपासून शोभिवंत वस्तू तयार करून दर्शनी भागात ठेवण्यात आल्या आहेत.**

## आरोग्य प्रहर

# सकाळी रिकाम्या पोटी ज्यूस पिणे शरीराला अपायकारक!

फळांमध्ये अनेक पोषकतत्व असतात. विविध सिझनची फळे खाल्ल्याने आपल्या शरीराला पोषकतत्व मिळत असतात. अनेक आजारांपासून त्यामुळे आपली सुटका होते. फळांचा ज्युस पिल्याने आपल्याला त्यातील पोषक घटक मिळतात असा तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. सकाळी उठल्या उठल्या उपाशीपोटी फळांचा रस पिण्याचे अनेक तोटे आपल्याला होऊ शकतात.



जेव्हा आपण रात्री झोपतो तेव्हा आपले शरीर मेन्टेनन्स करीत असते. त्यावेळी आपल्या पोटात अनेक प्रकारचे केमिकल्स निघत असतात. पचनासाठी एसिड निघत असते. पचनप्रक्रीये दरम्यान बायप्रोडक्टच्या रुपात एसिड जमा होत असते. हे गरजचे असते, परंतु तुम्ही जर सकाळचे ज्युस प्यायले तर पोटातील ॲसिडचे प्रमाण जास्त होईल. त्यामुळे चुकूनही सकाळी उठल्याउठल्या कोणतेही फळ खाऊ नका किंवा ज्युसदेखील पिऊ नका.

न्युट्रीशियन डॉ. प्रियंका रोहतगी यांनी सांगितले की, काही जण सकाळी फिरायला जातात आणि मिक्स फ्रुट ज्युस पितात. जरी ते मिक्स फ्रुट ज्यूस असले तरी नुकसान कारक ठरेल, परंतु हिरव्या भाज्यांचा ज्युस आणि फळांचा ज्युस एकत्र प्यायल्याने किडनी स्टोनचा धोका असतो.

हिरव्या भाज्या पालक किंवा ब्रोकलीत ऑक्जेलिक एसिड असते आणि फळांत साइट्रीक एसिड असते. जेव्हा ते पोटात जाते तेव्हा साइट्रिक ॲसिड ऑक्जेलिक एसिडला वेगाने शोषून घेते. इतक्या ऑक्जेलिक एसिडची गरज नसते. परिणामुळे ते किडनी स्टोन किंवा गॉल ब्लॅडर स्टोनमध्ये परिवर्तित होते. त्यामुळे सकाळी सकाळी फ्रुट ज्युसमध्ये भाज्यांचे ज्युस मिक्स करुन पिऊ नका ते आरोग्यासाठी अपायकारक असते.

ज्यांना मधुमेहाचा त्रास आणि किंवा गॅसेसचा त्रास आहे त्यांनी सकाळचा रस पिण्याच्या फंद्यात पडू नये. ज्युसमध्ये पल्प असल्याने डायबिटीज असलेल्यांनी ज्युस पिऊ नयेच. सर्वसाधारण लोकांनीदेखील सकाळी उपाशी पोटी ज्युस प्यायल्यास त्यांना हा त्रास होऊ शकतो. दिवसाचे लंच आणि रात्रीच्या डिनरच्या अगोदर काही तास आधी ज्यूस पिण्यासाठी योग्य वेळ आहे. म्हणजेच सकाळच्या नाश्त्यानंतर अर्ध्या तासाने तुम्ही ज्युस प्यालला तरी चालेल, कारण त्या वेळी शरीरात असिडचे प्रमाण इतके नसते.

# महायुतीला मतदान करून ताकद द्या –तृष्णा विश्वासराव

## लाडकी बहीण योजना संपर्क अभियान सभा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांना पुन्हा निवडून द्यायचे आहे. मागील अनेक दिवस लाडकी बहीण योजनेचे पैसे बँक वेगवेगळ्या कारणांनी परत घेत आहेत. त्यामुळे असे करून महिलांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले आहे. आम्ही आरबीआयकडे तक्रार केली आहे. लवकरच त्यांचे पैसे खात्यात वर्ग होतील. आपल्याला महायुतीला मतदान करून ताकद द्यायची आहे, असे आवाहन शिवसेना उपनेत्या तृष्णा विश्वासराव यांनी केले.

शिवसेना लाडकी बहीण योजना संपर्क अभियान सभेचे आयोजन पोसरी येथे केले होते. या सभेत उपनेत्या तृष्णा विश्वासराव यांनी महिला वर्गासोबत संवाद साधला. त्या पुढे म्हणाल्या की, आपल्याला महायुतीला मतदान करून ताकद द्यायची आहे, असे आवाहन केले.

शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांनी, कर्जत तालुक्यात प्रत्येक गावात संवाद बैठक सुरू आहेत. ही निवडणूक महिला वर्गासाठी अस्तित्वाची असून यासाठी महिलांनी निवडणूक हातात घ्या, असे आवाहन केले.

या वेळी शिवसेना महिला आघाडी कर्जत शहर संघटक भारती शिंदे, कर्जत खालापूर महिला आघाडी संपर्क प्रमुख मनीषा दळवी, माजी सभापती आरती भगत, कर्जत पंचायत समिती माजी सदस्या मीना थोरवे, मनीषा थोरवे, जिल्हा परिषद माजी सदस्या सहारा कोळंबे, पूजा थोरवे, कर्जत शहर प्रमुख भारती शिंदे, शहर संघटक सायली शहासने, मनीषा भासे, माथेरान शहरप्रमुख तसेच विभाग प्रमुख वैशाली ठाकरे, लता विश्वनाथ थोरवे, नंदिनी देशमुख, सपना गवळी आदी उपस्थित होते.

# खंडाळेमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**



ग्रामपंचायत खंडाळे मधला पाडा येथे माणुसकी प्रतिष्ठान, लायन्स हेल्थ फाऊंडेशन, एमजीएम पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मल्टिपल मेडिकल चेकअप कॅम्प घेण्यात आला. शिबिराचा लाभ १३६ जणांनी घेतला.

या वेळी रिजन चेअरपर्सन विजय वनगे, ॲड. निहा राऊत, ॲड. कला पाटील, सिव्हिलच्या डॉ. किमया थळे, डॉ. काळे, डॉ. हुलवान, खंडाळे सरपंच नासिकेत कावजी, सदस्य संदेश पाटील, राखी गुरव, सायली कावजी आदी उपस्थित होते.

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/भांडार विभाग/७८/२०२४-२५ दिनांक : ०४/१०/२०२४

### जाहिर सुचना क्र. ००३/२०२४-२५
### शुध्दीपत्रक

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाकरिता अवजारे (हार्डवेअर) साहित्य खरेदी करुन पुरवठा करणेबाबतची ई-निविदा प्रक्रिया करणेकरिता दिनांक ०१/१०/२०२४ रोजीपासुन ते दि. ०७/१०/२०२४ रोजीपर्यंत निविद क्रमांक २०२४_DMA_१०९९२४३_१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव सदरची निविदा रद्द करण्यात येत आहे. यांची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव

## जाहिर नोटीस

प्रोसेस जमा ता.

ॲड. नवीन वि. धोंगडी
अर्जदारांचे वकील

**मे. दिवाणी न्यायाधिश कनीष्ठ स्तर वाशी, सीबीडी बेलापुर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अर्ज.क. १०७५/२०२४
नि/६

१. श्री. कमलाकर बुधाजी कोळी, वय ५४ वर्षे, हिंदू, भारतीय रहिवासी, धंदा- व्यवसाय, राहणार - दिवाळे गाव, सेक्टर-१४, बेलापूर, तालुका आणि जिल्हा ठाणे ४०० ६१४.

२. श्री. रूपेश बुधाजी कोळी, वय ४१ वर्षे, हिंदू, भारतीय रहिवासी, धंदा नोकरी, राहणार - दिवाळे गाव, सेक्टर-१४, बेलापूर, तालुका आणि जिल्हा- ठाणे- ४०० ६१४.

३. श्रीमती. कविताबाई मनोज बाईत, वय ४५ वर्षे, हिंदू, भारतीय रहिवासी, धंदा - गृहिणी, राहणार - बेलापूर गाव, सेक्टर-२०, पोस्ट कोकण भवन, बेलापूर, तालुका आणि जिल्हा- ठाणे - ४०० ६१४.

४. श्रीमती. लक्ष्मीबाई बुधाजी कोळी, वय ६९ वर्षे, हिंदू, भारतीय रहिवासी, धंदा - गृहिणी, राहणार - दिवाळे गाव, सेक्टर-१४, बेलापूर, तालुका आणि जिल्हा- ठाणे- ४०० ६१४

अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं. ४ यांचे पति कै. बुधाजी सीताराम कोळी रा. दिवाळे गाव, सेक्टर-१४, बेलापूर, तालुका आणि जिल्हा- ठाणे ४०० ६१४ यांचे निधन त्यांचे बेलापूर, येथील निवासस्थानी दिनांक ०७/०५/१९८५ रोजी झाले. कै. बुधाजी सीताराम कोळी यांना मृत्युपश्चात वर नमूद अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांनी कै. बुधाजी सीताराम कोळी यांच्या मालकीच्या असलेल्या मौजे शहाबाज, तालुका व जिल्हा ठाणे येथील खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, या जमीन मिळकती हया नवी मुंबई प्रकल्पाकरीता भूसंपादित झाल्या आहेत व त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-शहाबाज, तालुका व जिल्हा ठाणे येथील**

| अनु. क. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. |
|---|---|---|---|
| १ | २५७/२ | २.१५.५ | ५.०० |
| २ | ३६५/ड | १.४३.८ | ३.९० |
| ३ | ४२०/१ | ०.३४.० | १.०० |
| ४ | ४२१/१ | ०.०८.१ | ०.३० |
| ५ | ४२२/१ | ०.५.० | ०.२० |
| ६ | ४२३/१ | १.१५.० | १.६० |
| ७ | ४२४/१ | ०.३७.० | १.०० |
| ८ | ४४२/१ | ०.०९.१ | ०.४ ३ |
| ९ | ४४३/१ | ०.२०.० | ०.६९ |
| १० | ४४७/१ | ०.१७.२ | ०.५० |
| ११ | ४४८/१ | ०.२३.३ | ०.७५ |
| १२ | ४५०/१ | ०.०९.१ | ०.४३ |
| १३ | ४५६/अ | १८.८०.० | ४०.०० |
| १४ | ४५६/ब | १३.९५.० | ३५.०० |
| १५ | ४८७/१पै | २०.९५.० | ५०.०० |

कै. बुधाजी सीताराम कोळी हे त्यांचे मालकीच्या वर नमुद संपादित मिळकतींचे मोबदल्यापोटी मे. सिडको लि., महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबवित असलेल्या गांवठाण विस्तार योजने अंतर्गत सिडकोकडुन विकसीत भुखंड मिळण्यास पात्र आहेत. कै. बुधाजी सीताराम कोळी यांचे पश्चात त्यांचे मालकीच्या मिळकतींमध्ये व सदरहू मिळणाऱ्या विकसीत भूखंडामध्ये अर्जदार यांचा सुद्धा हिस्सा, हितसंबंध आहे.

वरील अर्जदार श्री. कमलाकर बुधाजी कोळी वगैरे हे कै. बुधाजी सीताराम कोळी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. बुधाजी सीताराम कोळी यांच्या वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २५/०९/२०२४ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

सही/-
क. लिपिक
दिवाणी न्यायालय, क स्तर
बेलापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर
बेलापूर

## ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली
### ता. खालापूर. जि. रायगड

दिनांक :- ०५/१०/२०२४

सर्व अधिकृत ठेकेदारांना या नोटीस द्वारे कळविण्यात येते कि ग्रामपंचायत कुंभिवली ता. खालापूर जि. रायगड यांच्याकडील ग्रामनिधी अंतर्गत खालील कामे करावयाची आहेत. त्यांसाठी बांधकाम ठेकेदाराकडून मोहरबंद लिफाफ्यात निविदी मागवण्यात येत आहे. सदर कामाच्या कोऱ्या निविदा दि. ०९-१०-२०२४ पर्यंत रोजी दुपारी १२ पर्यंत कुंभिवली ग्रा.पं. मध्ये दिल्या जातील.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजपत्रीय रक्कम | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यासाठी कापडी पिशव्यांचे वाटप करणे | ३०००००/- | ३०००/- | १ महिने |
| २ | मागासवर्गीय वस्ती मध्ये भांडे वाटप करणे | १५००००/- | १५००/- | १ महिने |

कामाचे/साहित्य चे विवरणपत्र पंचायत कार्यालय मध्ये पाहायला मिळेल.

निविदा स्वीकारण्याची दिनांक व वेळ-११/१०/२०२४ वेळ दुपारी १ वाजे पर्यंत कुंभिवली

निविदा उघडण्याची दिनांक व वेळ ११-१०-२४ वेळ दुपारी ४ कुंभिवली

टीप. १. कामे व त्यांची बिले उपलब्ध निधी नुसार दिली जातील.

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे,**

१. सदर सर्व निवडींची प्रक्रिया ग्रामपंचायत मार्फत केली जातील. सदर निविदा नोटीस, सूचना, शुध्दीपत्रक, इत्यादी माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर उपलब्ध आहे.
२. निविदे सोबत ग्रामपंचायत कुंभिवली या नावाने १% रकमेचा डी डी किंवा रोख रक्कम भरून त्यांची सामान्य पावती जोडणे आवश्यक आहे.
३. कोणतेही कारण न दाखविता निविदा नाकारण्याचे व स्विकारण्याचे अधिकार प्रसिद्धी धारकाने राखून ठेवला आहे.
४. पॅन कार्ड व GST ची प्रत ग्रा.पं. कडे सादर करावी.
५.१०० रु बॉडपेपरवर प्रतिज्ञा पत्र ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी
६. कमीत कमी विविध दर सादर करणाऱ्या कामगारास कामे देण्याचा विचार केला जाईल.

सही/-
श्री. विश्वास न. वारे
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली

सही/-
सौ. रेखा घनश्याम वीर
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली

## जाहिर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते की, माझे आशिल **श्री महादेव प्रभाकर झेंडे** यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व खालील मिळकतीच्या विदयमान मालकांनी त्यांच्या खालील परिशिष्ठात वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकी हक्कांबाबत खात्री दिली आहे व सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याबद्दलची तसेच त्यांना पणन योग्य हक्क (मार्केटेबल टायटल) असल्याबद्दलची खात्री दिली आहे. तरी सदर जमीन मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्त्याही प्रकारचा मालकी हक्क हितसंबंध उदा गहाण, दान, पोटगी, चार्ज, लिज, कोर्ट डिकी, कोर्टात वादाचा विषय, भाडेकरू हक्क, कुळ, ताबा वहिवाट लायसन्स, वारसा हक्क, कर्ज, बोजा, करार, मदार, मुखत्त्यारपत्र, अक्षर अन्य कोणत्त्याही प्रकारे, हक्क, हितसंबंध व मालकी अधिकार असल्यास, त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत कागदपत्रे व त्यांच्या सत्त्यप्रतीसह लेखी हरकत नोंदवुन आमची खात्री पटवुन दयावी. वरील कोणाचीही हरकत न आल्यास सदरील जमीन मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी व बोजारहित आहे व त्यावर कोणाचाही कोणत्त्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचही कोणत्त्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही व तसा कोणाचाही कोणत्त्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक समजुन उमजुन सोडुन दिलेला आहे. असे समजण्यात येईल व नंतर कोणाचीही हरकत / तकार चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

**: परिशिष्ट :**
**गाव-मोसारे, तालुका -पनवेल, जिल्हा-रायगड.**

| अ.क्र. | जमीन मालकांचे नाव | गट क. | क्षेत्रफळ | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | हे. | आर. चौमी | रू. | पै. |
| १ | श्री. कमळाकर आंबो म्हात्रे | २७/१ | ०० | २९.८० | १ | ९४ |
| २ | श्री. त्रिशूल शंकर म्हात्रे | २९/४ | ०० | ५३.०० | ९ | ०० |
| ३ | श्री. आझाद तुळशीराम म्हात्रे | २९/३ | ०० | २७.७० | २ | ७५ |
| ४ | श्री. राजकमल कमळाकर म्हात्रे | ३०/१/अ | ०० | २५.०० | ४ | ८५ |

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ४/१०/२०२४**

सही/-
दिप्ती जगदीश पाटील
वकील
पत्ताः रियल टेक पार्क, ऑफिस नं. ११०९/१०, सेक्टर ३०ए, वाशी, नवीमुंबई.
मोबाईल ९०२८५६५२६०

## पनवेल महानगरपालिका, पनवेल
### जाहीर आवाहन

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील इयत्ता ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधारणा उपक्रम राबविणेसाठी निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल यांचेकडून मागविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी एकूण २९९ विद्यार्थी असून अंदाजपत्रकीय रक्कम ९,९७,५००/- आहे. या कामी इच्छुकांनी निविदा दर ७ दिवसांच्या मुदतीत दि.१४/१०/२०२४ रोजी सायंकाळी ३:०० वाजे पर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे सादर करावी. सदर उपक्रमासाठी पुरवठादारा कडे खालील कागद पत्रे अनिवार्य आहेत. याची संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

१. दुकाने व व्यापारी अस्थापनेत नोंदणी कृत असल्याचा दाखला, नाव पत्ता व मोबाईल क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.
२. पॅन दाखला व सुक्ष्म, लघु यवंम मध्यम उध्यम मंत्रालय चे नोंदणी कृत प्रमाण पत्र
३. अंदाजीत रक्कमे पेक्षा कमी दर स्विकारण्यात येतील.
४. महापालिकेच्या मालकीच्या शैक्षणिक संस्था/शालेय विद्यार्थी यांना किमान 'ब' वर्ग महानगरपालिकेच्या शाळांमधून सदर उपक्रम यशस्विपणे राबविले बाबतचा ५ वर्षाच्या आतील अनुभव असल्याची कगद पत्रे किंवा प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. 'अ' वर्ग महापालिकेच्या शाळांमधून सदर प्रकल्प राबविण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
५. महापालिकेचे मा. अतिरिक्त आयुक्त / मा. शिक्षणाधिकारी यांचा शालेय विद्यार्थांचे हास्ताक्षरामध्ये सुधारणा झाल्याचा अभिप्राय आवश्यक.
६. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेकडे सदर संस्था / क्लासेसची मान्यता असणे आवश्यक आहे.
७. सदर उपक्रम आदेशाच्या दिनांकापासून तत्काळ राबविण्यात यावा.
८. विहित मुदती व अ.क्र. ५ नुसार सुधारणा झाल्याचा अभिप्राय देयका सोबत सादर न केल्यास देयक अदा करण्याची जबाबदारी पनवेल महापालिकेची राहणार नाही.
९. जाहिर निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.

**जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२४/ प्र.क्र. ५२४/५२६/२०२४**
**दिनांक: ०४/१०/२०२४**

सही/-
उप आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल
### पिनकोड-४१०२०६

E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७० (ई-निविदा) सन २०२४-२५**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ०१ काम समाविष्ट असून ऑफलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०१.१०.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.१०.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ०५/१०/२०२४**

सही/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

## महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
### अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग
### पिन कोड - ४०२ २०१

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई- निविदा सूचना क्र. ३३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग मुरुड जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ३८,३९,४८७/- |
| २) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ३६,९७,११९/- |
| ३) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जि. रायगड येथील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. १५,५७,१५०/- |
| ४) | सा.बा. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग अलिबाग क्र.२ जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ४१,१५,३२५/- |
| ५) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग अलिबाग क्र.१ जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. ३९,५९,६१०/- |
| ६) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग पेण जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. २९,९८,६२६/- |
| ७) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग पेण जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. | रु. २०,९१,०३०/- |
| ८) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग पेण जिल्हा रायगड येथील कार्यक्षेत्रातील इमारतीच्या परिसरात वृक्षलागवड करणे व ३ वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह. | रु. ६,७१,७९९/- |
| ९) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग अलिबाग जिल्हा रायगड येथील कार्यक्षेत्रातील इमारतीच्या परिसरात वृक्षलागवड करणे व ३ वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह. | रु. १४,४५,९२५/- |
| १०) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जिल्हा रायगड येथील कार्यक्षेत्रातील इमारतीच्या परिसरात वृक्षलागवड करणे व ३ वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह. | रु. ५,११,६३५/- |
| ११) | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग मुरुड जिल्हा रायगड येथील कार्यक्षेत्रातील इमारतीच्या परिसरात वृक्षलागवड करणे व ३ वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह. | रु. ६६,७३५/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक ४.१०.२०२४ (स.१०.००) ते दिनांक ११.१०.२०२४ (सं.१८.००)

**ई-निविदा उघडणे** :- दिनांक १४.१०.२०२४ (दु.३.०० वा.) (कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग अलिबाग)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ५११६/२०२४**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१**
**दिनांक :- ०३/१०/२०२४**

सही/-
(ज.ई. सुखदेवे)
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि.रायगड

# कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**माणगाव** : पोटणेर गावच्या हद्दीत भरधाव वेगाने येणाऱ्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी (दि.३) सकाळी ११:३० वा.च्या सुमारास घडला.

भागोजी खैरे (वय ६७, रा.धाटाव,रोहा) हे दुचाकी (एमएच ०६ बीसी १४०५)वरून जात असताना पोटणेर गावाजवळ मागून येणारी इंडीव्हर कार (एमएच ०२ ईई ७५२०)वरील आरोपी चालकाने अतिवेगात येऊन धडक दिली. या अपघातात भागोजी खैरे यांचा मृत्यू झाला. कारचालक पळून गेला. माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ग्रामपंचायत, वाकडी
### ता. पनवेल, जि. रायगड
### टेंडर नोटीस

जा.क्र. १६०/२०२४ दिनांक : २७/०९/२०२४

ग्रामपंचायत वाकडी, ता. पनवेल यांनी खालीलप्रमाणे सन २०२४-२५ साठीचे अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत पायाभूत सुविधा क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत मंजूर विकास कामाच्या जाहीर निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये दि.०७/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय वाकडी यांचे कडे मागविनेत येत आहेत. सदर कामाच्या कोऱ्या निविदा मिळण्याची तारीख दि.२७/०९/२०२४ ते दि.०७/१०//२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.

सदर निविदा दि.०७/१०/२०२४ रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्यादिवशी कार्यालयीन वेळेत उघड्नेत येतील. कामाकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत ओवळे च्या नावे डी.डी./रोख स्वरूपात स्वीकारण्यात येईल. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अथवा नाकारणे चे अधिकार ग्रामपंचायतिने राखून ठेवले आहेत. ५ % सुरक्षा अनामत कामाच्या बिलामधून कपात करण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | निविदा फी | निविदा स्विकारणे अंतिम तारीख | कामाचे कालावधी | निधीचा खोत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ग्रामपंचायत वाकडी येथे इब्राहीम शेख यांच्या घरासमोरील रस्ता करणे. | १०००००० | १०००० | १०० | ०७/१०/२०२४ | २ महिना | अल्पसंख्यांक निधी |
| ५ | ग्रामपंचायत वाकडी येथे मुस्लिमवाडी येथे नळ पाणीपुरवठ्याची सोय करणे. | ५००००० | ५००० | १०० | ०७/१०/२०२४ | २ महिना | अल्पसंख्यांक निधी |

वरील प्रमाणे निविदा ग्रामपंचायत अटी व शर्ती कार्यालयात पाहून मान्य असल्यास बंद लिफाफ्यामध्ये निविदा विहित मुदतीत सादर कराव्यात.

सही/-
सचिन बाळाराम पाटील
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वाकडी
ता. पनवेल, जि.रायगड

सही/-
कुंदा बाळू पवार
सरपंच
ग्रामपंचायत वाकडी
ता. पनवेल, जि.रायगड

# पनवेलच्या चिखले गावात विकासगंगा

## रस्ता काँक्रीटीकरण आणि गणपती घाटावर शेडचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघाचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जलद गतीने विकास होत आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील चिखले येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ग्रामविकास योजनेंतर्गत २० लाख रुपयांच्या निधीमधून रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि गणपती घाटावर शेड बांधण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन शुक्रवारी (दि.४) भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकसाची कामे सुरू आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या १० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले ग्रामपंचायतीमधील रमेश ताढे यांच्या घरापासून हनुमान मंदिरपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच चिखले मधील गणेश घाटावर १० लाख रुपयांच्या निधीतून शेड बांधण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजपचे उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागिय अध्यक्ष अनेश ढवळे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, पनवेल पंचायत समतीचे माजी सदस्य निलेश पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, अनिता पाटील, चिखले अध्यक्ष हिरामण पाटील, सदस्य राम फडके, माजी उपसरपंच रमेश गडकरी, योगेश पाटील, नामदेव पाटील, विजय पाटील, गोमा पाटील, सुभाष गायकर, निलेश गायकर, संतोष मेढेकर, भालचंद्र पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोटरी क्लब पनवेल सेंट्रलतर्फे दिवाळी ड्रायफ्रुट प्रोजेक्ट

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे दिवाळी ड्रायफ्रुट हा फंड रेझिंग प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.४) पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बिल्डर राजूशेठ गुप्ते आणि शल्यचिकित्सक डॉ. गिरीश गुणे उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत ड्रायफ्रुटचे आकर्षक बॉक्सेस तयार करतात. हे बॉक्सेस अतिशय कमी प्रॉफीट मार्जिन ठेवून विक्री करण्यात येते.

या कार्यक्रमाच्या वेळी क्लबचे प्रेसिडेंट शैलेश पोटे, सेक्रेटरी दीपक गडगे, प्रोजेक्ट कॉर्डीनेटर आणि प्रेसिडेंट विवेक वेलणकर आणि इतर सदस्य उपस्थित होते.






**अलिबाग : कामगार नेते सुरेश पाटील यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांची सदिच्छा भेट घेतली.**

# पनवेल मनपातर्फे रेबीजमुक्त पनवेल कार्यक्रम

## २० शाळांमध्ये रेबीज जनजागृतीपर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय रेबीज दिवसाच्या पार्श्वभूमीवर रेबीजबद्दल जनजागृती करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये कार्यक्रम घेण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे २० शाळांमध्ये महापालिकेच्या वतीने रेबीज जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला, तसेच येत्या दिवसांत राहिलेल्या शाळांमध्येदेखील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शून्य रेबीज रूग्ण, रेबीजमुक्त पनवेल कार्यक्रमामधील हा एक उपक्रम म्हणून महापालिकेतर्फे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. रेबीज हा एक जीवघेणा आजार आहे. आपण हा आजार सहज टळू शकतो. रेबीज



जंतुसंसर्ग झालेल्या कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यामुळे रेबीज हा आजार होऊ शकतो. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यास झालेली जखम साबण आणि नळाच्या वाहत्या पाण्याने स्वच्छ धुऊन घ्या, तसेच जखमेला निर्जंतुक करण्यासाठी जंतुनाशक क्रीम लावा. जखमेला मिरची, तेल, चुना असे कोणतेही घातक पदार्थ लावू नये, तसेच ताबडतोब शासकीय दवाखान्यात जाऊन डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीजविरोधी लस घेणे गरजेचे आहे. लसीच्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. नागरिकांनी आपल्या घरातील पाळीव प्राण्यांचे वेळोवेळी रेबीजविरोधी लसीकरण करून घ्यावे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये रेबीजविषयी जनजागृती करण्यासाठी डॉ. वैभव विधाते व मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते व डॉ. मधुलिका लाड, डॉ. आकाश ठसाळे महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळांमध्ये जाऊन रेबीजविषयी माहिती देत आहेत.

# तळोजातील तरुणीवर अत्याचार; आरोपी जेरबंद

**पनवेल** : कळंबोलीतील तरुणाने २४ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. सागर विजयकुमार मिश्रा (२५) असे या तरुणाचे नाव असून कळंबोली पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

आरोपी सागर मिश्रा कळंबोलीत, तर पीडित तरुणी तळोजा येथे राहण्यास आहे. वर्षभरापूर्वी या दोघांची ओळख झाली होती. त्यांच्यामध्ये मैत्री होऊन प्रेमसंबंध निर्माण झाले होते. यादरम्यान सागर मिश्रा याने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून कळंबोलीतील रोडपाली गाव येथील विशाल रो-हाऊसमध्ये नेऊन तिच्यावर अनेकवेळा लैंगिक अत्याचार केले. सागर मिश्राने फोटोही काढले. त्यानंतर सप्टेंबर महिन्यामध्ये त्याने पीडित तरुणीसोबत लग्न करण्यास नकार दिला, पण तरीही तिने त्याच्यामागे लग्नासाठी तगादा लावल्यानंतर सागर मिश्रा याने लग्न करण्यास नकार देत तिचे अश्लील फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर तरुणीने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



# उरण नगर परिषदेतर्फे विविध कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

महात्मा गांधी जयंतीनिमित्त नगर परिषद क्षेत्रात २ ऑक्टोबर हा स्वच्छता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. उरण नगर परिषदेच्या साने गुरुजी बालोद्यान येथे स्वच्छता अभियान घेण्यात आले.

या अभियानात उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव तसेच लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता निखिल ढोरे, नगर रचना अधिकारी निकम सर, स्वच्छता निरीक्षक हरेश तेंजी, तसेच उरण नगर परिषदेचे अधिकारी कर्मचारी यांनी श्रमदान केले तसेच उरण नगर परिषद हद्दीतील शाळामधील विद्यार्थी यांनी देखील श्रमदान केले.

यानंतर स्वच्छता ही सेवा २०२४अंतर्गत नगर परिषदेमार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले होते. (सायकल स्पर्धा, हेल्थ कँप, एक पेड माँ के नाम वृक्षारोपण) यांचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले तसेच सायकल रॅलीमध्ये लकी ड्रॉ सायकल विजेत्या विद्यार्थ्यास सायकल देण्यात आली. उरण नगर परिषदेचे कर्मचारी व नागरिक यांच्या सहभागातून नगर परिषद कार्यालय ते महात्मा गांधी पुतळापर्यंत स्वच्छता परेड काढण्यात आली.

मुख्याधिकारी समीर जाधव यांनी महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले तसेच कलाकारामार्फत जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले.

# मुरबी शाळेत इंटरॅक्ट क्लबची स्थापना




**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी खारघर मिडटाउनतर्फे मुरबीच्या जिल्हा परिषद शाळेत इंटरॅक्ट क्लबचा स्थापना समारंभ करण्यात आला.

या वेळी क्लबचे अध्यक्ष शैलेश पटेल, दीपा पटेल, न्यू जनरेशन डायरेक्टर शुभांगी मालंडकर, सेवा प्रकल्प संचालक डॉ. रविकिरण आणि क्लबच्या इतर ज्येष्ठ सदस्यांच्या उपस्थितीत होते. शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक व विद्यार्थीही उपस्थित होते.


इंटरॅक्ट क्लबने कसे काम करणे आवश्यक आहे आणि सोसायटीच्या भल्यासाठी इंटरॅक्ट कोणती क्षेत्रे काम करू शकतात याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रतिष्ठापना समारंभानंतर रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊनतर्फे मुरबीच्या जिल्हा परिषद शाळेला त्यांच्या ग्रंथालयासाठी सुमारे ४० पुस्तके दान करण्यात आली. मुरबी शाळेचे मुख्याध्यापक यांनी रोटरी क्लब ऑफ खारघर मिडटाऊन यांचा धन्यवाद केला व पुढे ही असी मदत व मार्गदर्शन भेटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. ही सर्व माहिती पब्लिक इमेज डायरेक्टर कमलेश अगरवाल यांनी दिली.



जय अंबे नवरात्रोत्सव मंडळ पाले, उरण



सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ, गणपती चौक, उरण बाजारपेठ



श्री स्वामी समर्थ समाजमंदिर सेवा संघ, आनंदनगर, उरण



देवी पूजक समाज, डाऊर नगर, उरण

# कोळघर येथे एक झाड आईच्या नावे उपक्रम

**उरण : वार्ताहर**

ओएनजीसी उरण संयंत्रने अलिबागचा वनविभाग आणि एनजीओ शृंखला यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच भारत सरकारच्या एक पेड माँ के नाम उपक्रमाचा एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यातील कोळघर येथे १० विविध देशी जातींचे सुमारे १०,००० सीडबॉल टाकले.

ओएनजीसी टीमचे नेतृत्व सीजीएम हेड मेंटेनन्स आणि ऑफिशिएटिंग प्लांट मॅनेजर बिक्रम सिंग, सीजीएम मुख्य अभियांत्रिकी सेवा वायव्हीटीआर शेखर, जीएम हेड एचआर भावना आठवले आदींनी केले. स्थानिक आदिवासी महिलांनी स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने सीडबॉल तयार केले होते. जवळच्या आश्रमशाळेतील सुमारे ४००पेक्षा जास्त मुलांनी स्वतः सीडबॉल कसे बनवायचे आणि वेळेची बचत, अत्यंत कमी खर्चात वनिकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पारंपरिक वृक्षारोपण पद्धतीचे महत्त्व याविषयी एनजीओने आयोजित केलेले जागरूकता सत्र समजावले.



# खारघरमध्ये मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जास्तीत जास्त सोयीसुविधा देण्याच्या उद्देशाने मंगळवारी खारघरमधील केंद्रीय विहारजवळील प्राईड इमारतीच्या तळमजल्यावर मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्घाटन आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, प्रभाग अधिकारी स्मिता काळे, प्रभारी कर अधीक्षक सुनील भोईर, महेश गायकवाड, प्रभारी अधीक्षक जितेंद्र मढवी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मालमत्तांधारकांच्या बिलांमधील अडचणी लक्षात घेऊन, त्या सोडविण्यावर मालमत्ता कर संकलन विभागाने भर दिला आहे. नागरिकांना कर भरणे सोपे जावे, बिलामध्ये दुरूस्ती व्हावी, तक्रारींचे निवारण लवकर व्हावे तसेच महापालिका मुख्यालयात येण्या-जाण्याचा वेळ वाचावा या उद्देशाने हे मालमत्ता कर संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.




**पनवेल : नवरात्रोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या स्मारकापासून प्रेरणा मंत्र घेऊन दौड सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत कर्मवीर भाऊराव चौक, मिरची गल्ली, श्री जगनाडे चौकातून दुर्गमतेच्या मंदिरात येऊन पोहचली. तेथे गावदेवी मातेची आरती करण्यात आली, श्लोक घेण्यात आले व पुन्हा मार्गक्रमण करीत दौड शिवस्मारकाच्या येथे आली. तेथे ध्येयमंत्र घेऊन दौडची सांगता करण्यात आली.**

# छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्या -युवराज संभाजीराजे

**रोहे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्धनीती, नियोजनातून आपण कसे असामान्य काम करू शकतो हे दाखवून दिले. महाराजांचे आदर्श आपण स्वतःला घालून घेण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन युवराज संभाजीराजे छत्रपती यांनी केले. ते गुरुवारी (दि. ३) रोह्यात बोलत होते.

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रातील आतापर्यंत सर्वात उंच पुतळ्याचे अनावरण युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी किल्ले रायगडच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारणार आहोत. याकडे खासदार सुनील तटकरे यांनी लक्ष घालावे, असे आवाहन केले.



पुतळा अनावरण समारंभास सरखेल रघुजीराजे आंग्रे, खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, शिवरायांच्या काळातील मावळ्यांचे वंशज युवराज जेधे, रवींद्र कंक, प्रदीप मरळ, मंगेश शिळीमकर, विष्णूपंत पासलकर, अमित गायकवाड, समीर जाधवराव, आनंदा काशिद, रामदास धुमाळ, दिग्विजय शितोळे तसेच माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मुख्याधिकारी अजय एडके, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, सरचिटणीस सुरेश मगर, नंदकुमार म्हात्रे, शिवराम शिंदे आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी,

## रोह्यात शिवरायांच्या २५ फुटी पुतळ्याचे अनावरण



छत्रपती शिवाजी महाराज आपल्या देशाची अस्मिता, देशाचे मानबिंदू व जगाच्या पाठीवर शौर्याचे प्रतिक आहेत. महाराजांचा अभिमान सर्वांना आहे. आकाशात चंद्र, सूर्य, तारे असेपर्यंत शिवरायांचा जाज्वल्य इतिहास या जगाच्या पाठीवर अजोड राहील. त्यांना साजेल असे शिवस्मारक कुंडलिका नदीच्या तीरावर साकारणार असल्याचे सांगितले.

रघुजीराजे आंग्रे यांनी, धावीर महाराजांच्या नगरीत, आठवले शास्त्रींच्या नगरीमध्ये खऱ्या अर्थाने भक्ती आणि शक्तीचा संगम आज झालेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पूर्णाकृती पुतळा आपल्याला नेहमी आपल्यावर असलेल्या जबाबदारीची जाणीव देत राहील, असे म्हटले.

महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी, हा सोहळा ऐतिहासिक व अविस्मरणीय आहे. शिवसृष्टीचा पहिला टप्पा होत आहे. रोहेकरांची इच्छा होती सर्वांत उंच पुतळा बसविण्यात यावा ती आज पूर्ण होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे म्युझियम पुढच्या कालावधीत उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे नमूद केले.

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी प्रास्ताविकात राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा सर्वात उंच पुतळा रोह्यात उभारण्यात आला याचा आम्हाला अभिमान आहे. लवकरत या ठिकाणी शिवस्मारक उभारण्यात येणार आहे तसेच लेजर शोच्या माध्यमातून महाराजांचा जीवनपट या ठिकाणी दाखविण्यात येणार असल्याचे सांगितले.

### ◆ शिवशाही अवतरली

*रोहे मेहेंदळे हायस्कूल येथून सायंकाळी पाच वाजता भव्य अशी छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत विविध राजकीय पक्षांचे नेते, शिवप्रेमी, रोहेकर नागरिक सहभागी झाले होते, तर ढोल ताशे, शिवकालीन आखाडे, लेझीम, कसरती, सुरेख अशा रांगोळ्या, पताका व रोहेकरांनी उत्स्फूर्तपणे केलेले स्वागत पाहता रोह्यात जणू शिवशाही अवतरल्याचा अनुभव आला. नागरिक विशेषतः महिला व तरुण पारंपरिक वेशभूषा परिधान करून या मिरवणुकीत सहभागी झाले होते. शिवरायांच्या जयजयकाराने आसमंत दुमदुमले होते. संपूर्ण रोहे शहर शिवमय झाल्याचे पहावयास मिळाले.*

# मुरूडमधील शाळांना वॉटर प्युरिफायर

**मुरूड, रेवदंडा : प्रतिनिधी**

ऑक्टोबर सेवा सप्ताहाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अलिबाच्या सौजन्याने वॉटर प्युरिफायरचे वाटप करण्यात आले. मुरूड तालुक्यातील मांडला, वळके या केंद्रातील ३० शाळांमध्ये वॉटर प्युरिफायर शाळेतील शिक्षकांच्या ताब्यात देण्यात आले.

वॉटर प्युरिफायर आकर्षक असून साधारणपणे तीन ते पाच लिटर पाणी धारण करते. फिल्टर जाळीच्या साहाय्याने पाण्यातील खनिजे सुरक्षित राहून पाणी पिण्यायोग्य करते. या दृष्टीने हा सेट नक्कीच उपयोगी आहे. सेकंड डिस्ट्रिक्ट व्हॉइस गव्हर्नर प्रवीण सरनाईक, साईट



फर्स्टचे डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन एस.एन. मूर्ती, अलिबाग लायन्स क्लब अध्यक्ष ॲड. गौरी म्हात्रे यांच्या हस्ते त्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला अलिबाग लायन्स क्लबचे सचिव महेश कवळे, खजिनदार अंकिता म्हात्रे, फर्स्ट व्हीपी प्रदीप नाईक, डिस्ट्रिक्ट चेअरमन कम्युनिटी सर्व्हिस गिरीश म्हात्रे, अविनाश राऊळ, अतुल वर्तक, महेंद्र पाटील, संतोष पाटील, संजय मोरणकर, मनोज ढगे, प्रकाश देशमुख, चित्रा वर्तक, केंद्रप्रमुख सुनील पाटील, सुधीर नाईक यांच्यासह शिक्षक आणि लायन्स परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वळके केंद्रातील शिक्षिका मंजिरी गायधनी यांनी शाळांमध्ये वॉटर प्युरिफायरची आवश्यकता पूर्ण झाल्याने लायन्स क्लबचे आभार मानले.

# म्हसळा शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभेत योजनांची माहिती

**माणगाव : प्रतिनिधी**

म्हसळा तालुका शेतकरी उत्पादक कंपनीची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सभेचे उद्घाटक म्हणून अध्यक्ष शि.प्र.मंडळ ॲड. राजीव साबळे तर सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा भाजप जिल्हा सरचिटणीस प्रशांत शिंदे यांनी कामगाज पाहिले.

म्हसळा तालुक्यातील स्थलांतरित होत असलेल्या तरुण शेतकरी बांधवांना आपल्या गावातच शेतीच्या माध्यमातून विविध रोजगार व उत्पन्नाची साधने निर्माण करण्याकरिता कंपनीचे चेयरमन निलेश मांदाडकर यांच्या कुशल



नेतृत्वाखाली सर्व संचालक मंडळ काम करत असल्याचे कंपनीचे मुख्य प्रवर्तक निलेश थोरे यांनी सांगितले. या वेळी शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे कंपनीच्या सभेच्या एजेंड्यानुसार कार्यवाही करण्यात आली. तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येऊन शेतकऱ्यांना शेतीपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

ज्युनियर कॉलेज म्हसळाचे अध्यक्ष समीर बनकर, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका गौरी पयेर, माजी पं. स. सदस्या रचना थोरे, महाएफपीसीच्या जिल्हा समन्वयक शिल्पा साठे, भाजप तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, माणगांवचे स्वीकृत नगरसेवक सुनील पवार, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष कुणाल पाटील, सामाजिक कार्यकर्ते विरेश येरुणकर, सरपंच वनिता खोत, कंपनीचे चेअरमन निलेश मांदाडकर व संचालक मनोहर धर्मा तांबे यांनी हा कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली.

कंपनीचे संचालक पांडुरंग मेंदाडकर, रमेश पोटले, सदानंद शिर्के, काशिनाथ शितकर, अनंत नाक्ती, हरिचंद्र कांबळे, दिनेश पडावे, चंद्रकांत बेडेकर, लहू तुरे, यशवंत म्हात्रे, सुनील सावंत, नीलकंठ गाणेकर, हरिश्चंद्र नाकती, दशरथ तांबे,सहदेव जाधव, नामदेव घडशी, गाणेकर, प्रकाश लोणसीकर, सदानंद काते, जयेश जाधव, सुनील शिगवण, श्रीकांत जंगम, कौस्तुभ करडे, दिलीप भायदे, हरी कराडे, कल्पेश म्हात्रे, निलेश म्हात्रे, नारायण मेंदडकर, नारायण धुमाळ, प्रमोद म्हसकर, योगिता जाधव, अनंत कोंबनाक, धर्मी तांबे आदी उपस्थित होते.

# डॉ. देशमुख महाविद्यालयात स्वच्छता उपक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

केंद्र शासन, महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन रोहे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा या उपक्रमाचे आयोजन केले होते. हा उपक्रम उत्साहात राबवला गेला.

या उपक्रमात महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष कला व वाणिज्य वर्गातील राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते. स्वच्छता ही सेवा या उपक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. प्रारंभी प्रा. तुळशिदास मोकल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी स्वच्छता ही सेवा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालय, वर्ग, सार्वजानिक वापरात असणाऱ्या सर्व विभागांची व महाविद्यालय परिसरात स्वच्छता केली. त्याचबरोबर उपक्रमाचा एक भाग म्हणून रोहा रेल्वेस्थानकाची स्वच्छता करण्यात आली. या ठिकाणी रेल्वेस्थानक व्यवस्थापक ए.के. मीना, उप यवस्थापक राजीव कुमार, सुरक्षा रक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

प्लास्टिकमुक्त अभियानाचा एक भाग म्हणून देश कसा प्लास्टिकमुक्त होऊ शकेल यासाठी घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली, तर कागदी व कपडी बॅग बनविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. स्वच्छता ही सेवा या उपक्रमाचा एक भाग म्हणून सहभागी विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रके बनविली होते. त्याचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.




# ‘कुंडलिका’ संवर्धन परिसरात विकासकामांचे लोकार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात आलेल्या कुंडलिका नदी संवर्धन पार्किंगमध्ये रूम व शौचालयाचे लोकार्पण करण्यात आले. याचबरोबर अष्टमी नगर परिषद व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटाच्या माध्यमातून ब्युटी पार्लर युनिट मंगळवारी (दि.१) कार्यरत करण्यात आले.



प्रशिक्षणार्थींना या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. माजी आमदार अनिकेत तटकरे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस उपविभागीय अधिकारी रवींद्र दौंडकर, नेहा सिंग, शितल पुंड, मुख्याधिकारी अजय एडके, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, अशोक चव्हाण, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा काफरे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, मयूर दिवेकर, मानसी दाते, प्राजक्ता चव्हाण, सरोजिनी शिंदे, गीता पडवळ आदी उपस्थित होते.

या ब्युटी पार्लर युनिटमुळे महिलांना प्रशिक्षण व रोजगार मिळणार आहे. या कार्यक्रमास रोहा नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी महिला आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

**शासनामार्फत राज्यातील पहिले ब्युटीपार्लर रोह्यात होत असल्याने आम्हाला आनंद होत आहे. पाच महिलांचे आज प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. लवकरच तेजस्विनीचे जम्बो गारमेंट युनिट सुरू होणार आहे. ५००पेक्षा जास्त महिलांना रोजगार मिळणार आहे. ५० पिंक रिक्षा उपलब्ध करण्याचा प्रयत्न आहे.**
**–ना. आदिती तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री**

माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी, महिलांचे सक्षमीकरण व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महायुती सरकारच्या वतीने काम करण्यात येत आहे. शहरातील भगिनींना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. महिलांकरिता चांगला उपक्रम घेण्यात आला आहे, असे सांगितले.

# जि.प. शाळेतील मुले बनवतात आंबा कलम

## अभ्यासाबरोबरच माळी कामातही तरबेज

**पाली : प्रतिनिधी**

आंबा कलम बनविणे व माळीकाम करणे हे कौशल्याचे काम आहे. सर्वसामान्य लोकांनाही ते सहज जमणार नाही, परंतु सुधागड तालुक्यातील रा.जि.प. शाळा सिद्धेश्वर येथील लहानगे अगदी सहज व शास्त्रशुद्धरित्या आंबा कलम बनवितात. शाळेच्या परसबागेत बागकामदेखील करतात.

विद्यार्थ्यांना याबाबत अधिक माहिती देण्यासाठी व प्रात्यक्षिक करण्यासाठी नुकतीच येथे आंबा कलम कार्यशाळा घेण्यात आली. नॅशनल स्किल कॉलिफिकेशन फ्रेमवर्क अंतर्गत माळी काम व आंबा कलम कार्यशाळा पदवीधर शिक्षक जनार्दन



भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांचे गट पाडून प्रत्येक गटाला एक गावठी आंबा झाड, कलम पट्टी, कलम काडी, ब्लेड, प्लास्टिक बॅग दिली गेली. प्रथम गावठी झाडाचा शेंडा कट करून घेतला व नंतर त्यावर कलम काडीला २ इंच आकार देऊन गावठी आंब्यावर २ इंच छेद दिला. आकार दिलेली कलम काडी गावठी आंब्यावर घट्ट बसविली व कलम पट्टीच्या साह्याने घट्ट बांधले. तयार झालेल्या आंबा कलमावर वरून लहान प्लास्टिक बॅग टाकली व खाली धागा बांधला. अशा प्रकारे प्रत्येक कृती मुलांकडून प्रात्यक्षिक दाखवून करून घेतले.

या उपक्रमातून मुलांना स्वतः आंबा कलम तयार करता आला. त्यांचा आत्मविश्वास आणखी वाढला आहे. उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रोहिणी खामकर तसेच शिक्षका स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे यांनी खूप मेहनत घेतली. या उपक्रमाचे शिक्षणाधिकारी रायगड पुनिता गुरव, व्हिएसटीएफ जिल्हा कार्यकारी रत्नशेखर गजभिये, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविंद्र यादव, उपाध्यक्षा तेजस्विनी गायकवाड व सर्व सदस्य तसेच सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

**पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे. भावी काळात शेतीला महत्त्व प्राप्त होणार आहे. विद्यार्थ्यांना बागकाम व शेतीकाम येणे गरजेचे आहे. या दृष्टीने कलम करण्याचे कौशल्य शिकल्यास ते स्वतः रोपवाटिका तयार करू शकतात. हा पर्यावरणस्नेही उपक्रम विद्यार्थांना खूप आवडला. त्यामुळे मुलांना पर्यावरणाची आवड निर्माण झाली आहे. शाळेतील काही विद्यार्थी स्वतः कलम करतात. याबाबतचे व्हिडीओ यू ट्यूबवर टाकले आहेत, ते पाहून आपणही कलम करू शकता.**
**–जनार्दन भिलारे, शिक्षक, रजिप शाळा सिद्धेश्वर**


## पनवेल महानगरपालिका, पनवेल

**ता. पनवेल, जि. रायगड**

**तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२४ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणीसाठी दिनांक २५/१०/२०२४ ते दिनांक ०३/११/२०२४ पर्यंतच्या कालावधीसाठी जागा उपलब्ध करुन देणेत येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवणेत आलेल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडणेची आहे. प्रत्येक स्टॉल हा १० X १० आकाराची राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

| अ.क्र. | नोड | आरक्षण | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल | प्ले ग्राऊंड | २E | ३६ | ८७६४.५४ |
| २) | कळंबोली | प्ले ग्राऊंड | १ | २८ | ३३३९२.११ |
| ३) | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ | ६३४३.९५ |
| ४) | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४९७६.८६ |
| ५) | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+११४ | ६६७१.५९ |

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी सबंधित इच्छुकांनी फटाके विक्री धारकांनी दिनांक ११/१०/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, ही संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/माव्य/२४२४/प्र.क्र.१७/४८८/२०२४
दिनांक :- ०४/१०/२०२४

सही/-
उप-आयुक्त,
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिकेतर्फे जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (दि. ४) नवीन पनवेल येथील डॉ. पिल्लई ग्लोबल अकॅडमी येथे करण्यात आले होते. १४, १७ आणि १९ वयोगटाखाली मुले व मुलींसाठी ही स्पर्धा घेण्यात आली. महापालिका क्षेत्रातील ६० शाळांमधील ६३४ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेवेळी अतिरिक्त आयुक्त भरत राठोड, उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर, प्राचार्य प्रकाश नायर उपस्थित होते. पनवेल महापालिका क्रीडा विभागाच्या समन्वयातून ही स्पर्धा घेण्यात आली.

या वेळी प्राचार्य प्रकाश नायर यांनी बुद्धिबळ स्पर्धकांना मार्गदर्शन केले. त्यांच्यासमवेत मुख्य संयोजक ज्येष्ठ क्रीडा शिक्षक प्रताप शिंदे, महापालिकेचे सहाय्यक संयोजक समीर रेवाळे उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा प्रमुख विशाल गावडे, हितेश कडू तसेच सहाय्यक प्रतिनिधित्व स्नेहा गोंधळेकर, किशोर चटॅर्जी आणि निखिल आहेर यांनी मेहनत घेतली.

## टी-२० सामना; ग्वाल्हेरमध्ये सुरक्षा वाढवली

**ग्वाल्हेर : वृत्तसंस्था**

कसोटी मालिका २-०ने जिंकल्यानंतर भारतीय संघ आता बांगलादेशविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना रविवार (दि. ६)पासून ग्वाल्हेरमध्ये होणार आहे. या सामन्यापूर्वी ग्वाल्हेरमध्ये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे, जेणेकरून सामना सुरळीतपणे आयोजित करता येईल.

हिंदू महासभेने सामन्याच्या दिवशी म्हणजेच ६ ऑक्टोबरला ग्वाल्हेर बंदची हाक दिली आहे. याशिवाय अन्य संघटनांनीही आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. बांगलादेशात हिंदूंवर झालेल्या अत्याचारप्रकरणी रविवारचा सामना रद्द करण्याची मागणी करत हिंदू महासभेने बुधवारी निदर्शनेही केली.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बॉक्सिंगमध्ये विजयी पंच

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने पनवेल महापालिका आयोजित जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने सहा सुवर्ण, पाच रौप्य व ११ कांस्य अशी एकूण २२ पदके जिंकली आहेत.

हर्षिता संदीप पाटील, पार्थ हणमंत सपकाळ, श्रीराज उदयकुमार कदम, आविक सुमंता मुखर्जी, दिशा उमेश घनवट, अल्फिया शहजाद अन्सारी यांनी सुवर्ण; सुजय संजय शिंदे, रूद्र सुनील पाटील, समीर शिरीषकुमार चव्हाण, उसामा उमरमिया पटेल, प्रिया शिवाजी खरात यांना रौप्य; तर देवेन प्रवीण पवार, वेद संजय चव्हाण, पियुष चंद्रमाप्रसाद शुक्ला, नम्रता सुनील सलते, वंश विकास शिंदे, आदित्य अशोक राणे, तनिल निलेश उकर्डे, वेदांत मच्छिंद्र म्हात्रे, सृष्टी संदीप बोरूडे, यज्ञेश अमोल खेडेकर, ओंकार दत्तात्रय पाटील यांनी कांस्यपदक प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, संभाजी जाधव आणि रवींद्र शेळके यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, स्कूल कमिटी सदस्य प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.





**झंकार नवरात्रोत्सव**









पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने झंकार नवरात्रोत्सव २०२३चे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे या उत्सवाचे १९वे वर्ष आहे. गुरुवारी पहिल्याच दिवशी येथील दांडियाला रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा चिटणीस अमरिश मोकल, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, वर्षा ठाकूर, स्वाती कोळी, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अंकित जैन, विनोद बाफना, नीता झुंझारराव आदी उपस्थित होते. दरम्यान, पहिल्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.







पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवरात्रोत्सवानिमित्त विराजमान देवींचे दर्शन घेतले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक.

**नवरंग** रंग हिरवा



सीकेटी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग विद्यालय, नवीन पनवेल



अनंत पांडुरंग भोईर विद्यालय, दापोली-पारगाव, ता. पनवेल महिला शिक्षिका

जीवेत् शरद: शतम्!

सरस्वती कांबळे

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

निलम कोळी



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com